७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची
दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
गुरुवार, दि. २१ मे २०२६
www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews
संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १४५ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# शेतकऱ्यांसाठी २५ टक्के पेट्रोल पंप राखीव करा

## अन्यथा सरकारी वाहनं फिरु देणार नाही, जळगावमध्ये शरद पवार गटाचा इशारा

**जळगाव (दै. संध्या)**



राज्यातील अनेक भागात इंधनाचा तुटवडा भासत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणच्या पेट्रोल पंपावर रांगा लागल्या आहेत. जळगाव जिल्ह्यात देखील काही भागात इंधनाचा तुटवडा भासत आहे. याच मुद्द्यावरुन राष्ट्रवादी कॉंग्रेस शऱद पवार पक्ष आक्रमक झाला आहे. पुढील 24 तासात सरकारने शेतकऱ्यांसाठी 25 टक्के पेट्रोल पंप राखीव न केल्यास, कोणतेही सरकारी वाहन रस्त्यावर फिरु देणार नाही असा इशारा राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या वतीने आज जळगावमध्ये देण्यात आला आहे.

सध्या पेट्रोल पंपावर डिझेल मिळत नसल्याने, शेतकऱ्यांच्या शेत जमिनी तयार करताना मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. येत्या पंधरा दिवसात जर शेतकऱ्यांच्या जमिनी तयार होऊ शकल्या नाहीत तर पेरण्या करण्यास अडचणी निर्माण होऊन, शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणीत वाढ होणार आहे. त्यामुळं तातडीने शेतकऱ्यांसाठी सरकारने डिझेल पंप राखीव करण्यात यावे अशी मागणी केली आहे. मात्र, सरकारने असा निर्णय घेतला नाही तर मात्र कोणतेही वाहन रस्त्यावर फिरू देणार नाही,असा इशारा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

इंधन तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्हाधिकाऱ्यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. जालना जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांना 5 टक्के इंधन साठा राखीव ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. अत्यावश्यक सेवा आणि शासकीय सेवेतील वाहनांसाठी राखीव ठेवण्याचे आदेश दिले आहेत. तर कॅन, बाटली किंवा प्लास्टिक कंटेनरमध्ये पेट्रोल-डिझेल देण्यास बंदी घालण्यात आली आहे.

इंधन तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्हाधिकाऱ्यांनी महत्त्वाचा निर्णय घेत सर्व पेट्रोल पंपांना पाच टक्के इंधनसाठा राखीव ठेवण्याचे आदेश दिले आहेत. अत्यावश्यक सेवा तसेच शासकीय वाहनांसाठी पेट्रोल किंवा डिझेल राखीव ठेवण्याचे जिल्हाधिकारी अशीमा मित्र यांनी आदेश काढलेत. तसेच या आदेशात पेट्रोल पंपावर कॅन, बाटली किंवा प्लास्टिक कंटेनर मध्ये पेट्रोल डिझेल देण्यास देखील बंदी घातली आहे, या संदर्भात जालना जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश पारित केले आहेत. दरम्यान जालना जिल्ह्यातील अनेक पेट्रोल पंपांवरती नागरिकांची डिझेल खरेदी करण्यासाठी गर्दी पाहायला मिळत आहे त्या पार्श्वभूमी जालना जिल्हाधिकाऱ्यांनी हा निर्णय घेतला आहे.

## वांद्रे अतिक्रमण आणि राडा, झोपड्यांवर आताच बुलडोझर का?



**मुंबई (दै. संध्या)**

वांद्र्यातील अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान स्थानिक नागरिक आक्रमक झाल्याने त्यांच्यावर लाठीचार्ज करावा लागल्याची घटना घडली. या ठिकाणी अनधिकृत झोपडपट्ट्या असल्याने ते हटवताना तणावाची परिस्थिती निर्माण झाल्याचं दिसून आलं. दुसऱ्या दिवशीच्या कारवाईवेळी स्थानिक नागरिकांकडून पोलिसांवर बाटल्या फेकण्यात आल्या. त्याला प्रत्युत्तर म्हणून पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केला.

ही कारवाई अजून तीन ते चार दिवस सुरू राहण्याची शक्यता आहे. काही दिवसांपूर्वी एका परदेशी ब्लॉगरनं वांद्र्याच्या रेल्वेलाईनच्या आजूबाजूच्या झोपडपट्टी अतिक्रमणाचा व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट केला होता. त्यानंतर सोशल मीडियावर मोठा गदारोळ झाला. मुंबईतील वांद्रे स्टेशन परिसरात, पश्चिम रेल्वेच्या जागेवर अनधिकृत बांधकामं आणि झोपडपट्ट्यांचं अतिक्रमण करण्यात आलं आहे.

## स्थानिक बेरोजगार युवकांच्या रोजगारासाठी विशेष मोहीम राबवा

**मुंबई (दै. संध्या)**

रायगड जिल्ह्यातील स्थानिक बेरोजगार युवकांना सुरक्षा रक्षक पदावर रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याची आवश्यकता आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी तपासणी प्रक्रिया अधिक प्रभावी करावी. सुरक्षा रक्षकांच्या नोंदणीपासून आस्थापनांच्या तपासणीपर्यंतची सर्व कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावीत. महिन्याच्या कालावधीत याबाबत कार्यवाही पूर्ण व्हावी, असे निर्देश, कामगार मंत्री ॲड आकाश फुंडकर यांनी दिले.

नरिमन भवन येथे रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या वतीने नोंदणीकृत तरुणांना रोजगार उपलब्ध करून देताना येणाऱ्या अडचणींबाबत दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीला विधान परिषद आमदार विक्रांत पाटील तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

कामगार विभागाचे प्रधान सचिव आय. ए. कुंदन, कामगार आयुक्त एच. पी. तुम्मौड, उपसचिव स्वप्नील कापडणीस आदी बैठकीला प्रत्यक्ष उपस्थित होते.

सुरक्षा रक्षकांची नियुक्ती, आस्थापनांची नोंदणी आणि खासगी संस्थांवर नियंत्रण ठेवणे ही मंडळाची मुख्य जबाबदारी आहे. ही कामे नियमित आणि प्रभावीपणे झाली पाहिजेत. लोकप्रतिनिधी आणि स्थानिक



कामगार मंत्री ॲड आकाश फुंडकर

प्रशासनाचे सहकार्य मिळाल्यास संबंधित आस्थापनांवर आवश्यक नियंत्रण आणणे शक्य होईल, असेही मंत्री ॲड फुंडकर यांनी स्पष्ट केले. रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यक्षेत्रातील विविध आस्थापनांमध्ये बृहन्मुंबई व ठाणे जिल्ह्यातील सुमारे २५० सुरक्षा रक्षक कार्यरत असल्याने रायगडमधील स्थानिक युवक रोजगाराच्या संधींपासून वंचित आहेत. सध्या रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या प्रतीक्षा यादीवर २ हजार ५३१ सुरक्षा रक्षक असून, त्यांच्या नियुक्तीद्वारे स्थानिक युवकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होऊ शकतो, असा अभिप्राय मंडळाने व्यक्त केला. याबाबत ठाणे आणि रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील अधिकाऱ्यांनी संयुक्त बैठक घेऊन तातडीने निर्णय घ्यावा, असे निर्देशही कामगार मंत्री ॲड आकाश फुंडकर यांनी दिले.

## ‘सीएसआर’ निधीच्या उपयोगातून महाराष्ट्रात प्रगतीचा नवा अध्याय – मुख्यमंत्री

**मुंबई (दै. संध्या)**

सामाजिक उत्तरदायित्व निधी (सीएसआर)च्या माध्यमातून देशात दरवर्षी सुमारे 36 हजार कोटी रुपये खर्च केले जातात. हा निधी खर्च करण्यामध्ये महाराष्ट्र अव्वल स्थानी आहे. सीएसआर निधीच्या उपयोगातून समाजात शासकीय योजनांचा प्रभाव अनेक पटीने वाढवता येऊ शकतो. त्यामुळे समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहचत असून महाराष्ट्रात प्रगतीचा नवा अध्याय लिहिला जात असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

हॉटेल प्रेसिडेंटच्या सभागृहात इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाच्यावतीने आयोजित टेक महा इम्पॅक्ट परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव परिमल सिंग, महा आयटीच्या आयुक्त भुवनेश्वरी एस, इलेक्ट संस्थेचे रवी गुप्ता, माहिती तंत्रज्ञान महामंडळाचे मुख्य परिचलन अधिकारी भगवान पाटील आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात सर्वाधिक सीएसआर निधी उपलब्ध होतो. या निधीचा मोठा हिस्सा मुंबई आणि पुणे महानगर प्रदेशात खर्च



टेक महा इम्पॅक्ट परिषदेचे आयोजन

होतो. हा निधी केवळ काही विशिष्ट भागांपुरता मर्यादित न राहता या निधीच्या उपयोगातून संपूर्ण राज्यांमध्ये परिणामकारक काम होण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. ‘व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन इनिशिएटिव्ह‘ उपक्रम अंतर्गत शासनाने सीएसआर भागीदारांच्या मदतीने एक हजार गावांचा कायापालट करून ती गावे ‘शाश्वत विकास ध्येयांवर’ आधारित बनवली आहे. या अनुभवावरून स्पष्ट होते की, जेव्हा शासकीय यंत्रणा, व्याप्ती आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील लवचिकता, तंत्रज्ञान व संसाधने एकत्र येतात, तेव्हा सामाजिक क्षेत्रात ‘गुणाकार प्रभाव’ पाहायला मिळतो.

सीएसआर भागीदारांच्या लवचिकतेमुळे शासकीय योजनांमध्ये समाजातील शेवटच्या घटकाचा विचार करून आवश्यक ते बदल करणे शक्य असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, टेक कंपन्या केवळ निधी देत नसून नवीन तंत्रज्ञान आणत आहेत, ज्यामुळे सीएसआर निधीचा वापर अधिक पारदर्शक आणि मोजता येण्याजोगा झाला आहे. कंपन्यांना त्यांच्या निधीचा थेट प्रभाव पाहायचा असतो. शासनासोबत भागीदारी करताना सीएसआर निधीतील प्रत्येक पैशाचा वापर थेट सर्वसामान्यांच्या कल्याणासाठीच केला जाईल. कोणत्याही अतिरिक्त व्यवस्थेवर किंवा पायाभूत सुविधेवर तो वाया जाणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

शिक्षण, आरोग्य, शेती, रोजगार अशा विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या सर्व सीएसआर भागीदारांचे आभार मानत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र शासनासोबतचा हा प्रवास अत्यंत सुलभ आणि समृद्ध ठरेल. या परिषदेने सामाजिक परिवर्तनाचा नवा अध्याय सुरू केला आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, राज्य अधिक समावेशक, समृद्ध आणि भविष्यवेधी बनवण्याचा दृढ संकल्प टेक महा इम्पॅक्ट परिषदेच्या माध्यमातून करण्यात आला आहे. ‘तंत्रज्ञान, नवोपक्रम आणि सीएसआर निधीच्या माध्यमातून समुदायांचे सक्षमीकरण हे आज आपल्या राज्याच्या विकासाचे मूळ सूत्र आहे. जोपर्यंत शासन, तंत्रज्ञान आणि कॉर्पोरेट क्षेत्र एकमेकांच्या हातात हात घालून चालत नाहीत, तोपर्यंत प्रगतीचे फायदे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचू शकत नाहीत. महिला, तरुण, ग्रामीण भाग आणि समाजातील वंचित घटकांपर्यंत विकासाची फळे पोहोचवणे हे सरकारचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्र हे देशाचे वित्तीय इंजिन असून, राज्याचा समावेशक व प्रगतीशील विकास करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. तंत्रज्ञान, नवोपक्रम आणि कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी निधीच्या समन्वयातून महाराष्ट्र अधिक समृद्ध होणार असल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला.






### ढिंग-टांग




## आचारसंहितेचा अडथळा नाही, फडणवीस सकारात्मक निर्णय घेतील : भरणे

# शेतकरी कर्जमाफी ३० जूनपूर्वी होणार

**मुंबई (दै. संध्या)**

शेतकऱ्यांसाठी एक अतिशय आनंदाची बातमी. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेली शेतकरी कर्जमाफीची घोषणा 30 जूनपर्यंत अंमलात येणार आहे. सध्या विधानपरिषद निवडणुकीची घोषणा झाली आहे. त्यासाठीची आचारसंहिता लागू झाली. त्यामुळे या काळात शेतकरी कर्जमाफी होणार नाही, अशी शक्यता वर्तवण्यात येत होती. मात्र, या सर्व चर्चांवर पडदा टाकत कृषीमंत्री दत्ता भरणे यांनी मोठी आणि दिलासादायक माहिती दिली आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या 17 जागांसाठी बिगुल वाजवले आहे. 25 जूनपर्यंत ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. नेमकी याच काळात कर्जमाफीची अंमलबजावणी होणार असल्याने, आचारसंहितेच्या नियमांमुळे ही प्रक्रिया रखडणार का? अशी शंका उपस्थित



केली जात होती. या निर्माण झालेल्या संभ्रमावर बोलताना कृषीमंत्री दत्ता भरणे यांनी स्पष्ट केले की, निवडणूक असली तरी कर्जमाफीच्या कामात कोणताही अडथळा येणार नाही. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस योग्य आणि सकारात्मक निर्णय घेतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भरणे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शेतकरी कर्जमाफीबाबत योग्य निर्णय घेतील. थकबाकीदार शेतकऱ्यांना 2 लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळेल. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 50 हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान दिले जाईल. येत्या 30 जूनपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम जमा होईल.”

विशेष म्हणजे, ही विधानपरिषद निवडणूक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघातून होत आहे. यात थेट जनता मतदान करत नसून, जनतेने निवडून दिलेले लोकप्रतिनिधी मतदान करतात. त्यामुळे या आचारसंहितेचा थेट फटका शासकीय योजनांना बसू नये, अशी रणनीती सरकार आखत असल्याचे दिसते. आचारसंहितेचे सावट असले तरी कृषीमंत्र्यांच्या वक्तव्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. आता दिलेल्या शब्दाप्रमाणे सरकार ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांच्या पदरात हे दान कसे टाकते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. शेती आणि नैसर्गिक संकटे यांचे नाते फार जुने आहे. अगदी राजे-महाराजांच्या काळातही तीन वर्षांतून एकदा तरी पीक हातचे जायचे, अशी नोंद इतिहासात आढळते. त्यावेळी संपूर्ण अर्थव्यवस्था शेतीवर आधारित असल्याने राजे संकटाच्या काळात शेतसारा (कर) माफ करायचे. काही राजांनी तर शेतीचा विकास व्हावा म्हणून कर्ज पुरवल्याचेही दाखले आहेत. परंतु, ते तात्पुरते निर्णय होते.




# संपादकीय

## हिंदी सिनेमाचा हिरो ‘कामगार’ असेल, तर तुम्हाला चालेल?

अलीकडील एका मुलाखतीत जावेद अख्तर यांनी एक महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. त्यांच्या मते, पूर्वीच्या हिंदी चित्रपटांमध्ये नायक अनेकदा कामगारवर्गातून येत असे. हिंदी चित्रपटातील नायक कधी गोदीवर काम करणारा मजूर, कधी गिरणी कामगार, हमाल, शेतमजूर किंवा टॅक्सीचालक अशा भूमिकांत दिसत असे. परंतु, आजच्या मुख्य प्रवाहातील हिंदी चित्रपटांमध्ये नायक कामगार आणि वंचितवर्गाचे प्रतिनिधित्व करताना दिसत नाही. जावेद अख्तर यांच्या मते याचे महत्त्वाचे कारण म्हणजे चित्रपटांचा बदललेला प्रेक्षकवर्ग. आजचे चित्रपट हे कामगार आणि वंचित वर्गासाठी बनतच नसून, पाचशे – सातशे रुपयांचे तिकीट सहज परवडणाऱ्या उच्च - मध्यम आणि अभिजन वर्गासाठी तयार होत आहेत. अगदी खरे आहे. एके काळी हिंदी चित्रपटांच्या कथानकांमध्ये कामगारांचे दैनंदिन जीवन, त्यांच्या संघर्षांचे वास्तव, अन्यायाविरूद्धचा लढा आणि श्रमाची प्रतिष्ठा यांना केंद्रस्थानी स्थान दिले जात असे. पूर्वी चित्रपटांत कामगारांचे जीवन केवळ दाखवले जात नव्हते, तर त्यातून समाजातील अन्याय, शोषण आणि वर्गसंघर्ष यांवर ठोस भाष्य घडत असे. ‘नया दौर’मधील ‘मशीन इंसान के लिए बनी है...’ हा संवाद औद्योगिकीकरणावर मानवी दृष्टिकोनातून प्रश्न उपस्थित करतो; तर ‘दो बिघा जमीन’मधील ‘धरती माँ है...’ हा शेतकरी–शेतजमीन नात्याचा भावनिक अर्थ अधोरेखित करतो. ‘काला पत्थर’मधील विजयचे ‘पेन इज माय डेस्टिनी’ हे वाक्य खाण कामगारांच्या जीवघेण्या वास्तवाला अधोरेखित करते; तर ‘दिवार’मधील ‘मैं आज भी फेंके हुए पैसे नहीं उठाता’ हा संवाद श्रमाच्या स्वाभिमानाचे रूपक बनतो. नायकाचा हा संघर्ष हा केवळ वैयक्तिक नसून सामाजिक आणि सामूहिक स्वरुपाचा असे. त्यामुळे प्रेक्षकांना त्यात स्वतःचे प्रतिबिंब दिसत असे. आज चित्रपट हे समाजातील सर्व घटकांचे प्रतिनिधित्व करणारे माध्यम न राहता, विशिष्ट वर्गाच्या आकांक्षांचे प्रतिबिंब बनत चालल्याचे स्पष्ट दिसते. आजच्या कामगारवर्गाच्या समस्या, त्यांचे जिवंत वास्तव, त्यांच्या संघर्षांची मांडणी हे मुख्य प्रवाहातील चित्रपटातील कथानकातून जवळजवळ गायब झाले आहे. झ्विगॅटो, भीड, लेबर पेन आणि होमबाऊंड यांसारखे कामगारजीवन केंद्रित हिंदी चित्रपट अलीकडे प्रदर्शित झाले खरे. पण, हे चित्रपट प्रामुख्याने ‘समांतर सिनेमा’ किंवा पर्यायी प्रवाहापुरतेच मर्यादित राहिले. बदललेला नायक आणि चित्रपट यामागे व्यापक सामाजिक - आर्थिक प्रक्रिया आणि संरचनात्मक बदल कारणीभूत आहेत. १९९०नंतरच्या उदारीकरणानंतर भारतीय अर्थव्यवस्थेत बाजारपेठेचे आणि उपभोगाचे महत्त्व झपाट्याने वाढले. जागतिकीकरणाच्या या टप्प्यात नव्या मध्यमवर्गाचा मोठा विस्तार झाला आणि त्याच वर्गाने सिनेमाचा मुख्य प्रेक्षकवर्ग म्हणून आकार घेतला. परिणामी, चित्रपटांची भाषा, कथानके आणि सौंदर्यदृष्टीही या नव मध्यम वर्गाच्या आकांक्षा, जीवनशैली आणि उपभोगाभोवती केंद्रित झाली. उदारीकरणासोबत तंत्रज्ञानाचाही मोठ्या प्रमाणावर ओघ आला. सॅटेलाइट टीव्ही, केबल नेटवर्क्स आणि नंतर डिजिटल प्लॅटफॉर्मर्सच्या उदयानंतर भारतीय चित्रपट क्षेत्रात आमूलाग्र बदल झाले. या नव्या माध्यमांवर पाश्चात्त्य कार्यक्रमांचा प्रभाव दिसू लागला, ज्यातून ग्लोबल, शहरी आणि उपभोगवादी जीवनशैलीचे आकर्षण वाढले. याउलट, असंघटित क्षेत्रातील कामगार, स्थलांतरीत मजूर, यांची लक्षणीय संख्या असतानाही ते सांस्कृतिक प्रतिनिधित्व आणि चित्रपटांमधून अदृश्य होत गेले. चित्रपट उद्योगाची अर्थव्यवस्थादेखील मोठ्या प्रमाणावर बदलली आहे. मल्टिप्लेक्स संस्कृती, वाढलेले तिकीट दर, कॉर्पोरेट गुंतवणूक आणि बॉक्स ऑफीसवरील नफ्यावर वाढते अवलंबित्व यामुळे चित्रपट निर्मिती ‘बाजारकेंद्री’ झाली आहे.

## संस्कृत सुभाषित

सुखा अंग देऊ नये। प्रयत्न पुरुषे सांडू नये।
कष्ट करिता त्रासू नये। निरंतर.

अर्थ – हे सुभाषित खरे तर सुखाचा मूलमंत्रच आहे. प्रयत्नवाद, उद्योग, तोही धैर्य, शौर्य, ज्ञान आणि दान अशा गुणांनी मंडित.

## गुरु वचन

### विश्वासघात म्हणजे आत्मघात

गुरू हरगोविंदसिंहजी यांच्या अत्यंत निकटवर्तियांपैकी एक म्हणजे पाइंदे खाँ. गुरुंना त्याच्यावर स्वत::पेक्षा जास्त विश्वास होता. त्याचे कतृर्त्व, त्याचे शौर्य या साऱ्यांवर गुरुजींचा अत्यंत विश्वास होता. परंतु पाइंदे खाँने याचा वेगळा अर्थ काढला आणि तो शिष्यांमध्ये गुरुजींचीच बदनामी करू लागला.

शिष्यांनी त्याला खूप समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्याचा काहीच परिणाम झाला नाही. तो कोणाचेच ऐकत नव्हता. शिष्यांनी गुरुजींनाही त्याच्या या गोष्टी सांगितल्या होत्या. गुरुजी मात्र शांत असल्याने शिष्यांना याचेही आश्चर्य वाटत होते. त्यांना कळतच नव्हते, की गुरुजींना अचानक काय झाले, पाइंदे खाँ गुरुजींच्या इतक्या जवळचा आणि तोच त्यांची बदनामी करतोय?

शेवटी गुरुजींच्या सहनशीलतेचा अंत झाला आणि त्यांनी घोषणा केली, की पाइंदे खाँला दरबारातून काढून टाकावे. यानंतर पाइंदे खाँने बंडखोरी केली आणि तो मोगलांना जाऊन मिळाला. त्याने गुरुजींना जाताना धमकीही दिली ’तुम्ही मोगलांपुढे टिकूच शकणार नाहीत’ गुरुजी शांत होते त्यांनी त्याची हकालपट्टी केली.

यानंतर पाइंदे खाँ थेट शहाजानला जाऊन भेटला आणि त्याने हरगोविंदसिंहजी विरोधात त्याचे कान भरले. शहाजहानने मग काले खाँच्या नेतृत्वाखाली एक फौज गुरुंवर हल्ला करण्यासाठी पाठवली. जालंधरमध्ये मोगल आणि शीख सैन्याचे युद्ध झाले.

या युद्धात पाइंदे खाँ ने गुरुंवर हल्ला चढवण्याचा प्रयत्न केला. गुरुंनी त्याचे वार चुकवत त्याला माफी मागायला सांगितली आणि असे केले तर, मी तुला माफ करेन असे आश्वासनही त्याला दिले. परंतु तो ऐकण्याच्या परिस्थितीत नव्हता, त्याला झालेल्या गर्वाने त्याच्या मेंदूवर ताबा मिळवला होता. त्याने पुन्हा गुरुजींवर हल्ला चढवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याच्या फारसा परिणाम झाला नाही.

गुरुजींनी त्याचा हाही वार चुकवला. त्याला पुन्हा शरण येण्याचे आवाहन केले. परंतु तो ऐकण्यास तयार नव्हता. शेवटी गुरुजींना त्याचा वध करावाच लागला. इकडे मोगल सैन्याचेही बारा वाजले. त्यांचाही पराभव झाला. आणि काले खाँ आल्या पावली पळत सुटला.

## उपदेशकथा

भारतीय चित्रपट उद्योगाचा पाया घालणारे निर्माते, दिग्दर्शक दादासाहेब फाळके यांनी प्रतिकूल परिस्थितीत अनंत अडचणींना तोंड देऊन राजा हरिश्चंद्र, भस्मासुर–मोहिनी व सत्यवान–सावित्री हे चित्रपट तयार केले. लंडनमध्ये दादासाहेबांचे हे तिन्ही चित्रपट दाखवले गेले. त्यांचे तंत्रकौशल्य पाहून सर्वजण चकीत झाले. ‘कायनोटोग्राफ’ या नियतकालिकाने लिहिले, ‘दादासाहेब इंग्लंडमध्ये जन्माला का आले नाहीत?’ त्यावेळी सुप्रसिद्ध निर्माते सोसिल हेपवर्थ यांनी दादासाहेबांना इंग्लंडमध्ये भारतीय चित्रपट निर्माण करण्याची विनंती केली. भरघोस पगार, स्वातंत्र्य, सन्मान असलेली ऑफर दादासाहेबांनी नम्रतेने नाकारली. त्यांचे आभार मानले व म्हणाले, ‘हा व्यवसाय केवळ स्वदेशी व्हावा म्हणून झटलो. भारतीय संस्कृती जगाला ज्ञात व्हावी म्हणून झटलो. भारतीय संस्कृती जगाला ज्ञात व्हावी म्हणून ध्यास घेतला. हा प्रस्ताव स्वीकारला तर माझ्या तत्त्वापासून ढळेन.’ पुढे प्रचंड आर्थिक संकटे झेलून त्यांनी स्वदेशी चित्रपटाचा मार्ग स्वीकारला.

कथा उपदेश : ध्येयनिष्ठ व्यक्तींना लोभ, मोह विचलित करू शकत नाहीत. त्यांच्या अढळ तत्त्वनिष्ठेनेच मोठी कार्ये उभी राहतात.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:पुष्य २६:४९:१०+ |
| २१ मे २०२६ | योग:गण्ड १०:५८:०२ |
| गुरुवार | करण:बालव ०८:२६:५३ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:कौलव १९:२०:४७ |
| अधिक ज्येष्ठ शके | सूर्य:वृषभ |
| संवत्– १९४८ | चन्द्र:कर्क |
| संवत्सर – पराभवनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – जिल्हेज |
| मास– अधिक ज्येष्ठ | तारीख – ४ |
| ऋतु– सौर ग्रीष्म | विशेष |
| शुक्ल पक्ष | गुरुपुष्यामृतयोगी |
| तिथि:पंचमी ०८:२६:५३ | सकाळी ६.०५ पासून |

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. ९५५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | | | 3 | | | 2 | | |
| | | | 6 | 4 | 5 | | | |
| | 5 | 6 | 7 | | | | 4 | 9 |
| | 7 | 1 | 8 | | | | | 2 |
| 9 | 6 | | | 5 | | | 3 | 8 |
| 8 | | | | | 2 | 4 | 6 | |
| 5 | 9 | | | | 3 | 6 | 2 | |
| | | | 5 | 9 | 4 | | | |
| | | 3 | | | 7 | | | 5 |

**: सूडोकु :**

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९५४ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 3 | 9 | 1 | 8 | 5 | 6 | 7 | 2 |
| 2 | 5 | 1 | 6 | 7 | 9 | 4 | 3 | 8 |
| 7 | 6 | 8 | 4 | 2 | 3 | 1 | 9 | 5 |
| 8 | 9 | 7 | 5 | 3 | 6 | 2 | 4 | 1 |
| 1 | 2 | 6 | 9 | 4 | 7 | 8 | 5 | 3 |
| 3 | 4 | 5 | 2 | 1 | 8 | 9 | 6 | 7 |
| 6 | 1 | 3 | 8 | 5 | 4 | 7 | 2 | 9 |
| 9 | 7 | 2 | 3 | 6 | 1 | 5 | 8 | 4 |
| 5 | 8 | 4 | 7 | 9 | 2 | 3 | 1 | 6 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९७७ – ब्रुसलेसच्या डक डी बरबंट हॉटेलमध्ये लागलेल्या आगीत १९ ठार.
- १९८१ – फ्रेनकोईस मीटेरंड फ्रान्सचा राष्ट्रपती बनला.
- १९९४ – दक्षिण यमन यमनपासून वेगळा करण्यात आला.
- २००७ – बांगलादेशात आणीबाणीदरम्यान दोन लाख लोकांना अटक करण्यात आली.
- २००७ – उत्तर लेबनॉनमध्ये लष्कर आणि अलकायदाशी संबंधीत संशयित कट्टरपंथींमध्ये झालेल्या जबरदस्त चकमकीत २२ सैनिक आणि १८ कट्टरपंथी ठार झाले.

### राष्ट्रीय

- १९९० – धार्मीक नेते मौलवी मोहम्मद फारुक यांची हत्या.
- १९९१ – भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची श्रीपेराम्बदुर येथे हत्या.
- १९९४– सुष्मीता सेन ४३वी मीस युनीव्हर्स बनली.
- २००६ – माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या १५ व्या पुण्यतिथीनिमित्त युवक कॉंग्रेसने श्रीनगर येथील शेर–ए–काश्मीर पार्कमध्ये आयोजित केलेल्या रॅलीवर अतिरेक्यांनी केलेल्या आत्मघाती हल्ल्यात ८ जण ठार आणि २० जण जखमी झाले.

### जन्म

- ०४२६ – प्लेटो, ग्रीक विद्वानचा जन्म.
- १९२८ – कलासमीक्षक व लेखक ज्ञानेश्वर नाडकर्णी यांचा जन्म.

### निधन

- ०९८७ – लुई ५वा, फ्रान्सचा राजा
- ०१९७३ – मराठी मुद्रण व प्रकाशन क्षेत्रातील व्यवसायिक बाळकृष्ण ढवळे यांचे निधन.
- २००२ – प्रसिद्ध निर्माते दिग्दर्शक सुलतान अहमद यांचे निधन.

## : SMS :

1 Aurat ne ishara krke tej a rhi bus ko roka.
Driver: Kaha jana hai?
Aurat: Jana 2 khi nhi. Bacha ro raha hai. Zara bs ka horn poo-poo baja Do.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३९.६ | २८.२ |
| अहमदनगर | ३८.२ | २६.२ |
| अकोला | ४४.९ | ३०.९ |
| अमरावती | ४४.१ | ३२.१ |
| बीड | ४९.६ | ३५.८ |
| भंडारा | ४७.७ | ३२.७ |
| बुलढाणा | ४५.२ | २९.६ |
| चंद्रपूर | ४७.७ | ३६ |
| चेन्नई | ४५.६ | २६.८ |
| नवी दिल्ली | ४२.५ | ३०.९ |
| धुळे | ४१.४ | २८.८ |
| गोंदिया | ४७.६ | ३२ |
| जळगाव | ४४ | ३०.८ |
| कोल्हापूर | ३६.५ | २४.४ |
| लातूर | ४२ | ३१ |
| मुंबई | ३८.६ | ३२.३ |
| नागपूर | ४६.२ | ३३.८ |
| नांदेड | ४५.८ | ३३.८ |
| नंदूरबार | ३८ | २९ |
| नाशिक | ३९.१ | २३.८ |
| पुणे | ३६.३ | २४ |
| पंढरपूर | ४१.१ | २९.७ |
| सातारा | ३८.२ | २३ |
| सांगली | ४०.२ | २५.४ |
| सोलापूर | ४२.९ | ३१.९ |
| वर्धा | ४६.१ | ३३.६ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा :पश्चिम
पूर्वी केलेल्या कामाचा चांगला परिणाम आज आपणास दिसणार आहे.

**तूळ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:दक्षिण
धन, संपत्तीच्या प्रकरणाचा निकाल आपल्या बाजूने लागेल.

**वृषभ :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पश्चिम
आर्थिक उत्पन्न वाढण्याचे योग आहेत त्या दृष्टीने प्रयत्न करा. आपल्या हिताचा सल्ला मिळेल.

**वृश्चिक :** शुभ रंग :पांढरा, शुभ दिशा:उत्तर
शुभकार्याची रूपरेषा आखल्यामुळे आपल्याला आनंद होणार आहे. आपल्या कामाची दखल घेतील.

**मिथून :** शुभ रंग– पांढरा, शुभ दिशा: उत्तर
कौटुंबिक जीवन आनंदमय राहील. वाद विवाद करू नका. कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा.

**धनू :** शुभ रंग: पांढरा,शुभ दिशा: उत्तर
व्यापारात आवश्यक असलेला बदल करावा फायदेशीर रहाल. व्यवसायाची सुरूवात लाभदायक ठरणार आहे.

**कर्क :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा: उत्तर
शैक्षणिक प्रतिस्पर्धेमध्ये आपणाला यश मिळणार आहे. व्यवसाय उत्तम चालणार आहे. समाजात यश, प्रतिष्ठा वाढेल.

**मकर :** शुभ रंग :काळा, शुभ दिशा :उत्तर
जीवनासाथीचे सहकार्य मिळाल्याने आत्मविश्वस वाढणार आहे. आपली प्रतिष्ठा वाढेल.


**सिंह :** शुभ रंग– गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम
प्रयत्न केले तर अशक्य असलेली कामे पार पडतील.तणाव निर्माण झाल्यामुळे मन विचलित होईल.

**कुंभ :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पश्चिम
अतिऊत्साह आपल्या दृष्टीने हानीकारक ठरणार आहे. रागावर नियंत्रण ठेवून संयमाने काम केले तर फायदेशीर राहील.

**कन्या :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: पश्चिम
घरच्या समस्यांकडे दुर्लक्ष करू नका. साहित्यिक कार्यक्रमात भाग घ्याल. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**मीन :** शुभ रंग :गुलाबी,शुभ दिशा:पश्चिम
वातावरण आनंदमय राहिल्यामुळे नवीन योजना साकार होतील. आरोग्य खराब होईल.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. ९५५



**आडवे शब्द**
१. जहाज
५. बदल
८. कोवळ्या दुधाचा पदार्थ
११. मातीचा कण
१२. पडणे
१३. उत्कर्षाचा काळ
१६. सामोपचार, चार वेदांपैकी एक
१७. हाणामारी
१९. बढाया मारणारा
२१. सही, स्वाक्षरी
२२. धोबी
२३. उणीव, चणचण
२४. पुराणानुसार सध्याचे युग
२५. भीम, दुर्योधन, हनुमान यांचे शस्त्र
२६. शंकराजवळचे छोटे चर्मवाद्य
२८. शपथ (हिंदी)
३०. वार्ताहर
३१. विशेष
३३. मुस्कटदाबी
३५. विठ्ठलभक्तीचा वसा घेतलेला
३६. तळे
३८. आत्मीयता, प्रेम
४०. डोक्यात, हातात घालण्याची फुलांची माळ
४१. इतरांना डावलून वरिष्ठ होणे याअर्थी म्हण– ’------- तिखट झाली’
४४. गाय
४५. थेट, सरळ
४७. श्रीकृष्णाचे नाना लीला करणारा याअर्थी उत्तरेकडे प्रचलित नाव
५१. जय नावाच्या पौराणिक ग्रंथाचे प्रचलित नाव
५३. बाजार
५५. पोरका
५६. आई
५७. चहा पिण्याचे जोडासाधन
५८. कुंपणाचा दरवाजा
५९. एक बारीक धान्य
६०. कठोर
६२. मुलगा
६३. भरभराट
६४. वेतन
६५. एक अशुभ रंग
६६. गाडीवर मिळणारा एक चटकदार पदार्थ
६९. ऐट, दिमाख
७०. त्वरित, ताबडतोब
७२. नूतन
७४. शंकराला वाहण्याचे त्रिदल
७५. बोबडी वळणे
७७. वाचणारा
७८. नैसर्गिक देशी शीतपेय
७९. जल
८०. अति खाण्याने पोटाला बसणारी ओढ
८१. वाढून दिलेले पदार्थ

**उभे शब्द**
१. लढाऊ नाविकदल
२. हत्तींचा राजा
३. छोटे तात्पुरते दुकान
४. श्रीमंत
५. झाडाला आलेली नवी पाने
६. लाट, मनाची इच्छा
७. टिंगल, चेष्टा
८. गुळगुळीतच्या विरुद्ध
९. व्रत
१०. शहाणा, सुज्ञ
१४. नोकरीतील स्थानबदल
१५. हात
१८. मरकट
२०. लचका तोडण्याचा प्रयत्न
२३. मुंग्याचे घर
२४. अलिप्तपणा राखायला शिकवणारे फूल
२५. आरडाओरडा, गोंधळ
२७. सुसर
२९. संतोषजनक
३०. लहान
३१. वैयक्तिक, खासगी
३२. कमळ
३४. जीव, प्राण, चैतन्य
३७. मिरवणूक
३९. भांडकुदळ, खमकी
४१. कावळा
४२. अपमान
४३. नम्र, वाकलेला
४६. छोटा डबा
४८. अचूक निदानासाठी ही ओळखता येणे महत्त्वाचे
४९. रोजचे तेच ते चाकोरीबद्ध जगणे (ला.)
५०. उचंबळणारे
५१. न सांगताना मनातील भाव ओळखणारा
५२. नाकाने हुंगण्याचे तंबाखूचे सुगंधी चूर्ण
५४. एकाग्र नजर
५५. विचित्र
५६. उचलण्यास वजनदार असे
५८. अतिशय
६०. काटकसार
६१. उलट, रीतीविरुद्ध
६२. बैलाचा सण
६५. तुरुंगवास
६७. विटी–दांडूतील खड्डा
६८. भावाची मुलगी
७०. अर्धांगवायू
७१. पाय
७२. धमनी, शीर
७३. प्रहार, घाव, आघात
७६. अधिकार श्रेणीतील स्थान

**जम्बो शब्दकोडे क्र. ९५३ चे उत्तर**

आडवे उत्तर १.दुधात साखर पडणे ७.सल ८.खंत १०.बटवा ११.चर १२.दार १३.गैर १५.पातक १७.भाबडा १८.रमाकांत १९.स्तव २१.चीत्कार २२.कसर २३.लीनता २५.तात २६.तत्पर २८.ममता ३०.खडाष्टक ३२.विरजण ३५.खरारा ३७.दर्शनी दरवाजा ३९.रस ४०.मीना ४२.सावकाश ४४.वचनाचा खरा ४७.डगर ४९.पर ५०.कट ५१.पतन ५४.श्वान ५५.विजार ५६.वाटचाल ५७.रवाना ६०.परकर ६३.तरणताठा ६६.वाट ६७.सार ६८.जरा ७०.वळवळ ७२.वन ७३.क्षपणक ७५.साज ७६.सगीत ७८.नगदनारायण ८१.परडी ८२.कळ ८३.काम ८४.गवत

उभे उत्तर : १.दुरापास्त २.तबक ३.साट ४.खवाटा ५.पचपचीत ६.डर ७.सरडा ९.तरतरी १२.दाब १३.गैरसमज १४.रमारमण १६.तवली १७.भारत २०.सुताडा २४.नखरा २५.ताकद २७.रविवासर २९.मखर ३१.धनी ३३.रजा ३४.आकाशयान ३६.रासवट ३८.दगड ४०.मीनाबाजार ४१.साचा ४२.साप ४३.वर ४५.खप ४६.रातवा ४८.गफलत ५०.कळप ५२.नटराज ५३.भरणा ५५.विकट ५८.वातावरण ५९.नाठाळ ६१.रवानगी ६२.धरण ६४.रमताराम ६५.जळजळीत ६७.सापशिडी ६९.राजद ७१.वसा ७२.वसंत ७४.कनक ७७.तप ७९.गळ ८०.नाका


RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे...



## भव्य दृश्यांसोबत भक्तीचा स्पर्श; ‘कृष्णावतारम्’ ठरला वर्षातील सर्वात चर्चित चित्रपट

पुणे (दैनिक संध्या) : भगवान श्रीकृष्णांच्या जीवनावर आधारित कृष्णावतारम् या चित्रपटाने सध्या देशासह जगभरात अभूतपूर्व लोकप्रियता मिळवली आहे. भव्य दृश्यरचना, प्रभावी कथानक आणि भक्तीभावाने परिपूर्ण सादरीकरणामुळे हा चित्रपट प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत असून बॉक्स ऑफिसवरही विक्रमी कमाई करत आहे. भारतातील एकूण ग्रॉस कमाई ₹२४.८१ कोटींवर पोहोचली असून एकूण नेट कलेक्शन ₹२०.९६ कोटी इतके झाले आहे. गेल्या काही दिवसांत चित्रपटाच्या कमाईत मोठी वाढ झाली असून अनेक ठिकाणी हाऊसफुल्ल शो सुरू आहेत. विशेष म्हणजे हा चित्रपट केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता प्रेक्षकांना एक आध्यात्मिक अनुभूती देत आहे. थिएटरमध्ये श्रीकृष्णांच्या भजनांचा गजर, भावनिक प्रसंगांदरम्यान प्रेक्षकांचे अश्रू आणि आनंदोत्सवाचे वातावरण पाहायला मिळत आहे. हिंदीसोबतच तेलुगू आणि तमिळ भाषांतील आवृत्त्यांनाही प्रचंड प्रतिसाद मिळत असून भारताबाहेरील कॅनडा, दुबई, फ्रान्ससारख्या देशांमध्येही चित्रपटाची मोठी चर्चा सुरू आहे. सोशल मीडियावर चित्रपटाविषयीचे व्हिडिओ, प्रतिक्रिया आणि भक्तीमय वातावरण मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. अनेक आध्यात्मिक गुरूंनी आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी चित्रपटाचे कौतुक केले असून हा चित्रपट भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि कुटुंबव्यवस्थेला नव्या पिढीसमोर प्रभावीपणे मांडत असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. कृष्णावतारम् आता केवळ एक चित्रपट नसून भक्ती, भावना आणि संस्कृतीचा जागतिक उत्सव बनला आहे.



## खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांची संसदीय स्थायी समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती

पुणे (दैनिक संध्या) : राज्यसभेच्या खासदार प्रा. डॉ. मेधा विश्राम कुलकर्णी यांची विज्ञान आणि तंत्रज्ञान, पर्यावरण, वने व हवामान बदल विषयक विभाग-संबंधित संसदीय स्थायी समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यसभा सचिवालयाने जारी केलेल्या अधिकृत पत्रानुसार, कार्यसंचालन नियम २६९ अंतर्गत डॉ. कुलकर्णी यांची या समितीच्या सदस्यपदीही नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यसभेचे सभापती यांनी या नियुक्तीस मान्यता दिली आहे. राज्यसभा सचिवालयाचे संयुक्त सचिव राकेश नैथानी यांनी डॉ. कुलकर्णी यांच्या नियुक्तीचे पत्र दिले. डॉ. कुलकर्णी यांची ही नियुक्ती १८ मे २०२६ पासून प्रभावी झाली आहे. विज्ञान व तंत्रज्ञान, पर्यावरण संरक्षण, वनसंवर्धन आणि हवामान बदलाशी संबंधित धोरणे, विधेयके व विविध विषयांचा अभ्यास करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी या समितीकडे असते. डॉ. कुलकर्णी या भाजपच्या ज्येष्ठ नेत्या असून, पुण्याच्या माजी आमदार आहेत. संसदेतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना याआधी संसदरत्न पुरस्कारानेही गौरविण्यात आले आहे. या नियुक्तीबद्दल आनंद व्यक्त करत डॉ. कुलकर्णी म्हणाल्या, संसदीय स्थायी समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यामुळे देशातील वैज्ञानिक प्रगती, पर्यावरण संरक्षण आणि हवामान बदलासंदर्भातील धोरणात्मक चर्चेत योगदान देण्याची संधी मिळणार आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानात झपाट्याने होणारी प्रगती, पर्यावरण संवर्धन यावर काम करण्याचा माझा प्रयत्न असेल, असेही त्यांनी नमूद केले.

## मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाबाबत राजकीय पक्षांची बैठक संपन्न

पुणे (दैनिक संध्या) : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येणाऱ्या मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आज सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक संपन्न झाली. उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुउद्देशीय सभागृहात आयोजित बैठकीत विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाची माहिती, आयोगाने जाहीर केलेले वेळापत्रक तसेच जिल्ह्यातील तयारीचा आढावा घेण्यात आला. यावेळी मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी मतदान केंद्रस्तरावर आवश्यक समन्वय ठेवणे, पात्र मतदारांची नोंदणी वाढविणे, नाव वगळणे किंवा दुरुस्ती प्रक्रियेबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणे तसेच व्यापक प्रसिद्धी करण्यावर भर देण्यात आला. मतदार यादी पुनरिक्षण प्रक्रियेत राजकीय पक्षांनी सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम,विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, निवडणूक विभागातील अधिकारी उपस्थित होते. उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर यांनी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर माहिती दिली.



# ह्युंडाई मोटर इंडिया फाऊंडेशनतर्फे प्रोजेक्ट अधिकार कनेक्ट

पुणे (दै. संध्या)

ह्युंडाई मोटर इंडिया फाऊंडेशन (एचएमआयएफ) या ह्युंडाई मोटर इंडिया लिमिटेडच्या सीएसआर शाखेने आज पुणे जिल्ह्यातील नवलाख उंबरे, मावळ येथे अधिकार कनेक्ट केंद्राचे उद्घाटन केले आणि अधिकार कनेक्ट वाहन’ला हिरवा झेंडा दाखवला. या माध्यमातून कंपनीने महाराष्ट्रातील सर्वसमावेशक विकास आणि कल्याणकारी योजना व्यक्तींपर्यंत पोहोचवण्याप्रती आपली कटिबद्धता अधिक दृढ केली. पुण्यातील हे उद्घाटन म्हणजे महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आलेल्या ह्युंडाईच्या व्यापक सीएसआर कटिबद्धतेचा पुढील टप्पा आहे, ज्यांतर्गत एचएमआयएफ राज्यामध्ये 56 कोटी रूपयांची सामाजिक विकास गुंतवणूक करत आहे.

प्रोजेक्ट अधिकार कनेक्टची रचना गरजू आणि वंचित घटकांना कागदपत्रांची पूर्तता, पात्रतेविषयी मार्गदर्शन, अर्ज भरण्यास मदत आणि दारापर्यंत पोहोचून सेवा देणे यांसारख्या माध्यमातून शासकीय कल्याणकारी आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी करण्यात आली आहे.

या उपक्रमाद्वारे महाराष्ट्रातील नागरिकांसाठी 350 कोटी रुपयांपेक्षा जास्त मूल्याचे सामाजिक सुरक्षा फायदे मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी अपेक्षा आहे. दरवर्षी 1 लाखांहून अधिक व्यक्तींच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव टाकण्याचे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे, ज्याद्वारे महाराष्ट्रातील जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत हे फायदे पोहोचतील याची खात्री केली जाईल. हा उपक्रम प्रामुख्याने दुर्गम आणि वंचित घटकांवर लक्ष केंद्रित करेल, ज्यामुळे कल्याणकारी योजनांचा लाभ खरोखर गरज असलेल्या व्यक्तींपर्यंत पोहोचू शकेल.

डिजिटल ओळख असलेले एक योजना कार्ड नागरिकांना दिले जाईल, जे पद्धतशीर रेकॉर्ड-कीपिंगसह योजनांचे फायदे मिळवणे सोपे करेल. अधिकार कनेक्ट केंद्र हे डिजिटल सक्षमीकरण सहाय्य, वित्तीय साक्षरता उपक्रम आणि कौशल्य विकास संधी प्रदान करून समुदायाची क्षमता वाढवणारे एक संसाधन केंद्र म्हणूनही काम करेल.



हा उपक्रम अधिकार सखी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रशिक्षित समुदाय समन्वयकांमार्फत राबवला जाईल, ज्यांना गावोगावी आणि पोहोचण्यास कठीण असलेल्या भागांमध्ये सेवांचा विस्तार करण्यास मदत करतील अशा अधिकार कनेक्ट वाहन’चे सहकार्य लाभेल. तळागाळातील नागरिकांना सुविधा देण्यासाठी आणि त्यांच्यात जागरूकता निर्माण करण्यासाठी या उपक्रमांतर्गत जवळपास 200 अधिकार सखी आणि स्वयंसेवक जोडले जातील.

व्यापक परिणामांवर लक्ष केंद्रित करत प्रोजेक्ट अधिकार कनेक्ट सध्या पुणे, नाशिक आणि गुरुग्राममध्ये प्रभावीपणे कार्यरत आहे. दुर्गम आणि वंचित घटकांपर्यंत आपली पोहोच अधिक दृढ करत हा प्रकल्प आता महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यात ही विस्तार करत आहे.

या उपक्रमाबाबत मत व्यक्त करत श्री. पुनीत आनंद, एव्हीपी अँड व्हर्टिकल हेड, कॉर्पोरेट अफेयर्स, कॉर्पोरेट कम्युनिकेशन अँड सोशल, ह्युंडाई मोटर इंडिया लिमिटेड म्हणाले, "ह्युंडाईमध्ये आम्ही असा विश्वास ठेवतो की, जेव्हा नागरिक सन्मानाने आणि आत्मविश्वासाने संधी, हक्क आणि कल्याणकारी योजनांचा लाभ घेऊ शकतात, तेव्हाच खऱ्या अर्थाने सामाजिक बदलाची सुरुवात होते. प्रोजेक्ट अधिकार कनेक्टच्या माध्यमातून आम्ही शासकीय कल्याणकारी तरतूदी आणि ज्यांना त्यांची सर्वात जास्त गरज आहे अशा समुदायांमधील तफावत दूर करण्याचा प्रयत्न करत आहोत. महाराष्ट्र हे आमच्यासाठी नेहमीच एक महत्त्वाचे केंद्र राहिले आहे आणि हा उपक्रम सर्वसमावेशक व समुदाय-केंद्रित विकासाप्रती असलेली आमची दीर्घकालीन वचनबद्धता दर्शवतो.”

संयुक्तपणे डिझाइन करण्यात आलेला हा उपक्रम एचएमआयएफचा विश्वसनीय अंमलबजावणी भागीदार असलेला 'हकदर्शक एम्पॉवरमेंट सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड'द्वारे प्रत्यक्ष पातळीवर कार्यान्वित केला जात आहे. हकदर्शककडे डिजिटल साधनांचा वापर आणि मानवी सहाय्य यांचा संगम करून शेवटच्या टप्प्यापर्यंत कल्याणकारी सेवा पोहोचविण्याचा सखोल अनुभव आहे. प्रशिक्षित फील्ड एजंट्सच्या मदतीने राबवला जाणारा हा समुदाय-केंद्रित दृष्टिकोन लाभार्थी ओळखण्यात, अधिकार सखींना सोबत जोडण्यात आणि केंद्राच्या माध्यमातून संपूर्ण सहाय्य पुरविणे या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावतो.

मावळ, पुणे येथे "अधिकार कनेक्ट केंद्र" सुरू करून एचएमआयएफने कल्याणकारी सेवा अधिक सुलभ, पारदर्शक आणि खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक करण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकले आहे. या उपक्रमाद्वारे संस्था, शासन आणि समुदायातील सहकार्याने लोकांच्या जीवनात खऱ्या अर्थाने बदल घडवता येतो, हे अधोरेखित होते.

# दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरास ‘अ’ वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा

पुणे (दै. संध्या)

पुण्यातील प्रसिद्ध दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरास ‘अ’ वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्यात आला आहे. मंगळवारी राज्य सरकारने हा निर्णय जारी केला. दरम्यान, तीन वर्षांपूर्वी दगडूशेठ गणपती मंदिराचा ‘क’ वर्ग पर्यटन स्थळांच्या यादीत समावेश करण्यात आला होता. मात्र, पुण्यातील ऐतिहासिक स्थळांच्या जवळ असणारे हे मंदिर धार्मिक व सांस्कृतिक पर्यटन साखळीतील महत्त्वाचा भाग असून, ‘अ’ वर्ग स्थळांच्या निकषात बसते. त्यामुळे मंदिराचा ‘अ’ वर्ग पर्यटन स्थळांच्या यादीत समावेश करण्यात येत असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

1893 साली स्थापित झालेले हे मंदिर पुण्याच्या इतिहास, श्रद्धा, संस्कृती आणि समाजसेवेचे प्रतीक आहे. धार्मिक भक्ती, सामाजिक एकोपा, सांस्कृतिक वारसा आणि पर्यटन विकास यांचा संगम या स्थळामध्ये आहे. पुणे शहरातील प्रसिद्ध आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचे असे हे स्थान महाराष्ट्राच्या धार्मिक, सामाजिक आणि पर्यटन परंपरेचे प्रतीक बनल्याचे पर्यटन विभागाने आपल्या निर्णयात नमूद केले आहे.



हे मंदिर पुण्यातील प्रमुख पर्यटन आकर्षणांपैकी एक असून, देश-विदेशातील पर्यटक पुणे भेटीदरम्यान येथे दर्शनासाठी येतात. मंदिराचे भव्य स्थापत्य, सुवर्णमंडित मूर्ती, आकर्षक प्रकाशयोजना आणि उत्सवकाळात पर्यटकांना विशेष आकर्षित करते. राज्यातील पर्यटन स्थळांची निवड व त्यांना ‘अ’ वर्ग पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्याबाबतचे निकष ठरविण्यात आले. या निकषांची पूर्तता होत असल्याने श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, पुणे या स्थळास ‘अ’ वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्यात आला.

# धरणे व तलावांमधील गाळ काढण्याच्या कामांना गती द्या – जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

पुणे (दै. संध्या)

जिल्ह्यात “गाळ मुक्त धरण, गाळयुक्त शिवार” अभियानांतर्गत धरणे व तलावांमधील गाळ काढण्याच्या कामांना गती देण्यासाठी जलसंधारण, जलसंपदा, लघु पाटबंधारे जि.प. विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना समन्वयाने आवश्यक कार्यवाही करावी. याबाबतची अधिकाधिकची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याच्या जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सूचना दिल्या आहेत.



अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांनी त्यांच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या कार्यकारी अभियंत्यांना पाठविलेल्या पत्रानुसार, संबंधित धरणांमधील गाळ काढण्यासाठी अंदाजपत्रके तयार करून सविस्तर प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हा जलसंधारण अधिकारी कार्यालयास सादर करावे. तसेच जलसंपदा विभागाच्या नियामक मंडळाची आवश्यक मान्यता घेण्याबाबतही सूचना करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, जलसंपदा विभागाकडून आवश्यक परवानगी प्रक्रियेस काही कालावधी लागत असल्यास त्या कालावधीत जिल्ह्यातील अति शोषित, संकटग्रस्त,अर्ध संकटग्रस्त तसेच टँकरग्रस्त गावांमध्ये गाळ काढण्याचे, जलसंधारण व दुरुस्तीची अधिकाधिक कामांबाबत नियोजन करून ती प्राधान्याने घ्यावीत. यामध्ये विशेषतः भूजल पुनर्भरण क्षमता असलेल्या कामांना प्राधान्य देऊन जलसंधारण संरचनांची दुरुस्ती, गाळ उपसा व पाणी साठवण क्षमता वाढविण्याच्या कामांवर भर देण्यात येणार आहे. या अभियानामुळे पाणीटंचाई कमी होण्यास, भूजल पातळी वाढण्यास तसेच शेतकऱ्यांना सुपीक गाळ उपलब्ध होण्यास मदत होईल, असेही जिल्हाधिकारी डुडी म्हणाले.

# दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात ६ वर्षीय चिमुरडीचा मृत्यू!

## ऑपरेशनदरम्यान डॉक्टरांचा निष्काळजीपणाचा आरोप

पुणे (दै. संध्या)

पुण्यातील वैद्यकीय क्षेत्राला काळीमा फासणारी Dinanath Mangeshkar Hospital आणि निष्पाप चिमुरडीचा जीव घेणारी एक अत्यंत सुन्न करणारी घटना एरंडवणे परिसरातील नामांकित ‘दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात’ घडली आहे. डोळ्यांच्या किरकोळ शस्त्रक्रियेसाठी दाखल झालेल्या प्रियांशी बागडे या अवघ्या ६ वर्षांच्या चिमुरडीचा ऑपरेशन थिएटरमध्ये (OT) संशयास्पद मृत्यू झाल्याने पुण्यात एकच खळबळ उडाली आहे. ऑपरेशन थिएटरमध्ये




जाताना हसतमुख असलेली प्रियांशी थेट मृत अवस्थेतच बाहेर आल्याने, डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे आणि चुकीच्या भुलीमुळेच तिचा बळी गेल्याचा थेट आणि गंभीर आरोप तिच्या हतबल वडिलांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रियांशीला डोळ्यांच्या तिरळेपणा आणि काचबिंदूच्या उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. “माझी मुलगी आत जाताना पूर्णपणे शुद्धीत होती, खेळत होती. मग अचानक असं काय झालं?” असा टाहो तिच्या वडिलांनी फोडला आहे. शस्त्रक्रिया सुरू झाल्यानंतर काही वेळातच डॉक्टरांनी प्रियांशीची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचे पालकांना सांगितले. नातेवाईकांनी केलेल्या दाव्यानुसार, उपचारादरम्यान मुलीच्या तोंडातून रक्त येत होते, जे डॉक्टरांच्या अक्षम्य चुकीकडे बोट दाखवते. एका मोठ्या रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या बेजबाबदारपणामुळे एका हसत्याखेळत्या कुटुंबाचा दिवा कायमचा विझला आहे.

या हृदयद्रावक घटनेनंतर संतप्त नातेवाईकांनी रुग्णालयात गर्दी केली होती. याप्रकरणी वडिलांनी तातडीने अलंकार पोलीस ठाण्यात (Alankar Police Station) रुग्णालयाविरोधात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी मृतदेह ससून रुग्णालयात शवविच्छेदनासाठी (Post-Mortem) पाठवला असून, ससूनच्या वैद्यकीय समितीच्या अहवालानंतरच मृत्यूचे अधिकृत कारण स्पष्ट होईल आणि पुढील फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल, असे पोलिसांनी सांगितले आहे.

# दहावी-बारावी परीक्षा डिजिटल होणार! प्रश्नपत्रिका थेट केंद्रांवर, उत्तरपत्रिका ऑनलाईन तपासणी

पुणे (दै. संध्या)

दहावी- बारावीच्या येत्या पुरवणी परीक्षेत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ डिजटल तंत्रज्ञानाचा वापर करणार आहे. त्यानुसार केवळ एका विषयाच्या प्रश्नपत्रिका डिजिटल पद्धतीने थेट परीक्षा केंद्रावर पाठविण्यात येणार आहेत. त्याचबरोबर परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिकादेखील डिजीटल पद्धतीने तपासल्या जातील. यातील परिणामांचा अभ्यास करून फेब्रुवारी-मार्च महिन्यात होणाऱ्या परीक्षेमध्ये त्याचा वापर केला जाणार असल्याची माहिती राज्य मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दहावी-बारावीच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका राज्य मंडळाच्या प्रचलित पद्धतीने ऑफलाईन देण्यात येत होत्या. तसेच उत्तरपत्रिकादेखील ऑफलाईनच तपासल्या जात होत्या. परंतु, आता या प्रश्नपत्रिका डिजीटल पद्धतीने थेट केंद्रांवर पाठविण्यात येणार आहेत. त्यासाठीची यंत्रणा राज्य मंडळाकडून विकसित करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका स्कॅन केल्या जातील आणि ऑनस्क्रीन मार्किंगसाठी शिक्षकांकडे जातील तसेच यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात ‘एआय’ची देखील मदत घेता येईल का, याचीही प्रायोगिक स्तरावर चाचपणी केली जाणार आहे.

# पुणे महापालिका सभा अचानक तहकूब; आचारसंहिता लागू होताच गोंधळ

पुणे (दै. संध्या)

विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर सोमवारी सुरू असलेली महापालिकेची सर्वसाधारण सभा अचानक तहकूब करण्यात आली.

जिल्हाधिकाऱ्यांचा फोन आल्यावर तब्बल दोन तासांनी निवडणूक आचारसंहिता लागू झाल्याने सभेचे कामकाज पुढे सुरू ठेवता येणार नसल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून सभागृहात देण्यात आली. यामुळे विरोधकांनी गदारोळ करीत सभागृहात चर्चा करता येत असल्याचे सांगत नागरिकांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात यावी, अशी भूमिका घेतली. मात्र, ही सभा तहकूब करण्यात आली.

सोमवारी (दि. 18) सुरू असलेल्या सर्वसाधारण सभेत शहरातील कचरा समस्येवर नगरसेवकांकडून चर्चा सुरू असतानाच आचारसंहिता लागू झाल्याची माहिती महापौर मंजूषा नागपुरे यांनी दिली. त्यानंतर सभागृह तहकूब करावे लागणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. मात्र, कचऱ्यासारख्या गंभीर विषयावर चर्चा सुरू असल्याने सभेचे कामकाज सुरू ठेवावे, अशी मागणी अनेक नगरसेवकांनी केली. मात्र, आचारसंहिता लागू झाल्याने दि. 18 मे ते 25 जून या कालावधीत महापालिका प्रशासनाला कोणतेही धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत तसेच स्थायी समितीमध्ये




निविदांशी संबंधित निर्णयांवरही निर्बंध असणार आहेत, अशी माहितीही महापौरांनी दिली.

विरोधी पक्षनेते नीलेश निकम यांनी कोणताही धोरणात्मक निर्णय घेतला जात नसल्याने चर्चा सुरू ठेवण्यास हरकत नसल्याचे मत व्यक्त केले. मात्र, विधी सल्लागार निशा चव्हाण यांनी नगरसेवक हेच मतदार असल्याने सभेतील चर्चेचाही निवडणुकीवर परिणाम होऊ शकतो, असे स्पष्ट केले. त्यानंतर महापौर नागपुरे यांनी सभा तहकूब करण्याची घोषणा केली.

निवडणूक कार्यक्रमानुसार दि. 18 मे रोजी विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध झाली आहे. त्यानुसार उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख 1 जून असून, 2 जून रोजी अर्जांची छाननी होणार आहे. अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत 4 जून निश्चित करण्यात आली आहे. मतदान 18 जून रोजी सकाळी 8 ते दुपारी 4 या वेळेत होणार असून, मतमोजणी 22 जूनला केली जाणार आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया 25 जूनपूर्वी पूर्ण होणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये बालकावर यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी

पुणे (दैनिक संध्या) : ज्युपिटर हॉस्पिटल पुणे येथे अवघ्या ३.८ किलो वजनाच्या आणि ८ महिन्यांच्या बालकावर यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली असून वैद्यकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. अत्यंत कमी वजनाच्या बालकावर करण्यात आलेल्या या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेमुळे त्या बालकाला नवजीवन मिळाले आहे. या प्रकरणातील विशेष बाब म्हणजे बाळाच्या आईने स्वतः पुढे येत जिवंत दाता म्हणून आपल्या यकृताचा काही भाग दान केला. योग्य वेळी घेतलेल्या या निर्णयामुळे बाळाचे प्राण वाचविणे शक्य झाले. हे बालक जन्मतःच प्रगत अवस्थेतील यकृत विकाराने त्रस्त होते. पारंपरिक उपचार निष्फळ ठरत असल्याने तातडीने यकृत प्रत्यारोपण करणे आवश्यक झाले होते. मात्र, एवढ्या कमी वजनाच्या बालकावर शस्त्रक्रिया करणे डॉक्टरांसमोर मोठे आव्हान होते. बाळाचे अवयव, रक्तवाहिन्या आणि श्वसनमार्ग अत्यंत नाजूक असल्याने प्रत्येक टप्प्यावर अत्यंत अचूक नियोजन करण्यात आले. शस्त्रक्रियेदरम्यान आईकडून घेतलेल्या यकृताच्या भागाचे बाळाच्या शरीररचनेनुसार अचूक जुळवून प्रत्यारोपण करण्यात आले. द्रव संतुलन, रक्तस्त्राव नियंत्रण, तापमान नियंत्रण आणि शस्त्रक्रियेनंतरची स्थिती स्थिर राखण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने काटेकोर नियोजन केले. मुख्य प्रत्यारोपण शल्यविशारद डॉ. बिपीन विभुते यांनी सांगितले की, "या प्रक्रियेसाठी प्रत्यारोपण शल्यविशारद, बाल यकृत तज्ज्ञ, भूलतज्ज्ञ आणि अतिदक्षता विभागातील डॉक्टरांमध्ये अत्यंत समन्वय आवश्यक होता." मुख्य भूलतज्ज्ञ डॉ. मनीष पाठक म्हणाले, "अशा लहान बालकाला भूल देणे हे अत्यंत कठीण कामांपैकी एक आहे. रक्तदाब, तापमान किंवा द्रव संतुलनातील अगदी छोटासा बदलही गंभीर परिणाम करू शकतो."

### 'जगद्धात्री'मधील शिवायचे निस्वार्थ प्रेम प्रेक्षकांच्या पसंतीस



मुंबई (दैनिक संध्या) : झी टीव्हीवरील 'जगद्धात्री' ही मालिका सध्या प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली असून तिच्या प्रेक्षकसंख्येत सातत्याने वाढ होत आहे. रोचक कथा, भावनिक नाट्य, गूढ वळणे आणि थरारक प्रसंग यांच्या जोरावर या मालिकेने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. मालिकेत शिवाय आणि जगद्धात्री यांच्यातील नातेसंबंध सध्या चर्चेचा विषय ठरत आहेत. शिवायचे जगद्धात्रीवरील प्रेम एकतर्फी असले तरी त्याचा तिच्यावरील निस्वार्थ पाठिंबा प्रेक्षकांना भावत आहे. जगद्धात्री त्याला आपला जिवलग मित्र मानते, मात्र शिवाय तिच्यासाठी प्रत्येक संकटात खंबीरपणे उभा राहतो. धोकादायक मोहिमा असोत किंवा देशमुख कुटुंबातील वैयक्तिक समस्या, शिवाय नेहमीच जगद्धात्रीची साथ देताना दिसतो. तिचे रक्षण करणे, तिला प्रोत्साहन देणे आणि तिच्या निर्णयांना पाठिंबा देणे यामुळे प्रेक्षक त्याला "ग्रीन फ्लॅग" व्यक्तिरेखा म्हणून पसंती देत आहेत. याबाबत अभिनेता फर्मान हैदर म्हणाला, "मला शिवायची भूमिका साकारायला खूप आवडते. माझ्या मते तो सध्या दूरचित्रवाणीवरील सर्वांत निरागस आणि मनापासून प्रेम करणाऱ्या व्यक्तिरेखांपैकी एक आहे. जगद्धात्रीसाठी तो करत असलेल्या छोट्या गोष्टी, तिला कायम आनंदी ठेवण्याचा प्रयत्न आणि कोणत्याही परिस्थितीत तिच्या पाठीशी उभे राहणे हे त्याचे वैशिष्ट्य आहे." तो पुढे म्हणाला, "शिवायबद्दल मला सर्वांत जास्त आवडणारी गोष्ट म्हणजे त्याचे निस्वार्थ प्रेम. तो जगद्धात्रीचा आदर करतो, तिची ताकद ओळखतो, तिच्या निर्णयांना पाठिंबा देतो आणि तिच्याकडून कधीच काही अपेक्षा ठेवत नाही. खरे प्रेम असेच असावे असे मला वाटते."

### चाकणला भंगार मालाला आग

चाकण (दैनिक संध्या) : शेतात साठवून ठेवलेल्या प्लॅस्टिक फोमच्या भंगार मालाला भीषण आग लागल्याची घटना मंगळवारी घडली. या आगीत जीवितहानी टळली असून, मालाचे मोठे नुकसान झाले आहे. चाकण येथील धाडगे मळ्यात मंगळवारी सायंकाळी सातच्या दरम्यान हा प्रकार घडला. चाकण नगरपरिषदेच्या अग्निशामक दलाच्या जवानांनी अवघ्या एक तासाच्या आत ही आग आटोक्यात आणली. येथील अग्निशमन दलाचे अधिकारी प्रकाश वाघ यांनी सांगितले की, येथील धाडगे मळ्यातील एका शेतात भंगार माल साठवून ठेवला होता. या मालाला अचानक आग लागल्याने सर्व माल आगीच्या भक्ष्यस्थानी पडला.

# श्रीमती शीतल तेली- उगले यांनी स्वीकारला कार्यभार

**पुणे (दै. संध्या) :**



भारतीय प्रशासकीय सेवेतील वरीष्ठ अधिकारी श्रीमती शीतल तेली- उगले यांनी विभागीय आयुक्त पदाचा कार्यभार आज स्वीकारला. २००९ च्या बॅचच्या भा.प्र.सेवेतील अधिकारी असलेल्या श्रीमती तेली यांचे राज्याच्या क्रीडा आयुक्त पदावरून पुणे विभागीय आयुक्त पदावर बदलीचे आदेश नुकतेच निर्गमित झाले होते. अतिरिक्त आयुक्त कविता द्विवेदी यांनी नूतन विभागीय आयुक्तांचे स्वागत केले.

श्रीमती तेली- उगले यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कला शाखा पदवी परीक्षेत सुवर्ण पदक मिळविले आहे. त्यांनी प्रशासकीय सेवेदरम्यान २०२३ मध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया सरकारांनी अर्थसहाय्यित व प्रायोजित केलेल्या, 'जलसुरक्षा' आणि 'वर्तुळाकार अर्थव्यवस्था' (सर्क्युलर इकॉनॉमी) या विषयांवर ऑस्ट्रेलिया येथे आयोजित विशेष प्रशिक्षणात सहभाग घेतला. त्यांची नागपूर जिल्ह्यात सहायक जिल्हाधिकारी म्हणून प्रशासकीय सेवेतील कारकीर्द सुरू झाली. त्यानंतर सहायक जिल्हाधिकारी चंद्रपूर, जळगाव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हाधिकारी, पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त, आयुक्त वस्त्रोद्योग आणि व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य हातमाग विकास महामंडळ, सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त आणि राज्याच्या क्रीडा आयुक्त अशा विविध पदांची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली आहे.

रायगड जिल्हाधिकारी असताना महाड येथील सावित्री नदीवरील पूल कोसळल्याच्या दुर्घटनेदरम्यान प्रशासनाचे सक्षम नेतृत्व आणि 'शोध व बचाव' मोहिमांमधील कामगिरीबद्दल त्यांचा सन्मान झाला होता. तसेच 'डिजिटल इंडिया सप्ताह'मध्ये तिसरा क्रमांक पटकावला. पुणे महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदाच्या कारकिर्दीदरम्यान पुणे महानगरपालिकेला 'स्कॉच ऑर्डर ऑफ मेरिट' आणि 'हुडको अवॉर्ड फॉर बेस्ट प्रक्टिसेस' (सर्वोत्तम कार्यपद्धतींसाठीचा पुरस्कार) यांसह अनेक पुरस्कार मिळाले. तसेच 'जनाग्रह' या अशासकीय संस्थेद्वारे करण्यात आलेल्या मूल्यमापनात, पुणे शहराला 'शहरी प्रशासनातील सर्वोत्तम शहर' म्हणून मानांकन मिळाले.

श्रीमती तेली यांच्या कार्यकाळात महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाने 'फॅब्रिक ऑफ युनिटी' मोहिमेचे आयोजन केले. या मोहिमेअंतर्गत खासदार, आमदार, सनदी सेवेतील अधिकारी यांच्यापासून ते विद्यार्थी, कामगार आदी ११०० हून अधिक, विणकाम क्षेत्रात नसलेल्या नागरिकांनी हातमागावर ९८ फूट लांबीचे कापड विनले. या कामगिरीची नोंद 'आशिया अँड इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' मध्ये झाली.

सोलापूर महानगरपालिका आयुक्तपदाच्या कालावधीत २०२३ मध्ये राष्ट्रपतींच्या हस्ते सोलापूर स्मार्ट सिटीला एकूण कामगिरीसाठीचा पश्चिम विभागासाठीचा 'विभागीय स्मार्ट सिटी पुरस्कार' प्रदान करण्यात आला. 'पीएम स्वनिधी' योजनेमध्ये २०२४ या वर्षात महानगरपालिकेने १२८ टक्के उद्दिष्ट साध्य केल्याच्या कामगिरीची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेली. 'मुख्यमंत्री सक्षम शहर स्पर्धा २०२३' मध्ये महानगरपालिकेने दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस पटकावले.

## श्रीलंकेत उभारणार डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन

**नागपूर (दै. संध्या) :**

भारत आणि श्रीलंका यांच्यातील बौद्ध धम्माच्या संशोधन आणि अध्यापन सहकार्याला नवे बळ देणारा महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. या कराराअंतर्गत श्रीलंकेची राजधानी असलेल्या कोलंबोमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारण्यात येणार आहे. यासोबतच या परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भव्य पुतळाही उभारला जाणार आहे. नागपुरात तीन दिवसीय 'विश्वशांती परिषद -२०२६' पार पडली. या परिषदेत श्रीलंका, नेपाल, थायलंड, लाओस, दक्षिण कोरिया आदीं देशातील भिक्खू संघ व प्रतिनिधी सहभागी झाले होते. दरम्यान भारत आणि श्रीलंका यांच्यात सांस्कृतिक करार करण्यात आला. या करारानुसार डॉ. आंबेडकर भवन उभारण्यात येईल असा करार संघकाय फाउंडेशनचे अध्यक्ष भदंत प्रशीलरत्न गौतम आणि श्रीलंकेतील माथा फाउंडेशनचे संस्थापक वें. अथुरलिये रतना थेरो यांच्या दरम्यान स्वाक्षरीने झाला. या कराराचा मुख्य उद्देश आंतरराष्ट्रीय बौद्ध सहकार्य अधिक दृढ करणे, भगवान बुद्धांच्या शिकवणीचा जागतिक स्तरावर प्रसार करण्यासोबतच शांतता, बंधुता आणि मानवतावादी मूल्यांना प्रोत्साहन देणे हा आहे.

## तुमची आवडती 'गायनॅक' पुन्हा ड्युटीवर हजर

- अॅमेझॉन एमएक्स प्लेयरने सादर केला टीव्हीएफ आणि गर्लियापा यांच्या 'हू'ज युवर गायनॅक?' सीझन 2चा ट्रेलर
- सबा आझाद प्रमुख भूमिकेत असलेला 'हू'ज युवर गायनॅक?' सीझन 2 हा 22 मेपासून अॅमेझॉन एमएक्स प्लेयरवर मोफत पाहता येणार

**मुंबई (दै. संध्या) :**




हलक्याफुलक्या विनोदामुळे, सहज जोडून घेता येणाऱ्या व्यक्तिरेखांमुळे आणि आधुनिक स्त्रीजीवनाकडे प्रामाणिकपणे पाहणाऱ्या कथानकामुळे प्रेक्षकांची पसंती मिळवलेली 'हू'ज युवर गायनॅक?' ही लोकप्रिय कॉमेडी-ड्रामा मालिका आता नव्या सीझनसह परतत आहे. भारतातील आघाडीची मोफत, प्रीमियम आणि जाहिरात-आधारित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा असलेल्या अॅमेझॉन एमएक्स प्लेयरने आज या बहुप्रतीक्षित दुसऱ्या सीझनचा ट्रेलर सादर केला. या नव्या सीझनमध्ये डॉ. विदुषी कोठारी पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, अनेक वर्षांपासून ज्या आयुष्याचे स्वप्न ती पाहत होती, त्या नव्या टप्प्याकडे तिची वाटचाल सुरू होताना दिसणार आहे. द व्हायरल फीव्हर (टीव्हीएफ) आणि गर्लियापा निर्मित या मालिकेत सबा आझाद पुन्हा प्रमुख भूमिकेत दिसणार असून, करिश्मा सिंह आणि आरॉन अर्जुन कौल यांच्यासह ही कथा जिथे थांबली होती, तिथूनच पुढे सरकणार आहे. हिमाली शाह दिग्दर्शित या नव्या सीझनमध्ये कुणाल ठाकूर, विभा छिब्बर आणि श्रुती सेठ यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. 22 मे रोजी प्रदर्शित होणारा 'हू'ज युवर गायनॅक?' सीझन 2मधून रुग्णांसाठी, मित्रांसाठी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वतःसाठी उभे राहण्याची भावनिक आणि प्रेरणादायी कथा प्रेक्षकांसमोर सादर करण्यात येणार आहे. या ट्रेलरमधून डॉ. विदुषी कोठारी (सबा आझाद) हिच्या आयुष्यातील नव्या टप्प्याची भावनिक आणि मनाला भिडणारी झलक पाहायला मिळते. पहिल्या सीझनमधील घटनांनंतर तीन महिन्यांनी विदुषीने एकेकाळी अशक्य वाटणारे पाऊल उचलले आहे.

## इसुझू डी-मॅक्स एस-कॅबसाठी आकर्षक भाडेपट्टा सुविधा

**चेन्नई (दै. संध्या) :**

- व्यावसायिक वाहनांसाठी अधिक स्मार्ट पर्याय
- दरमहा रु. 38,999 पासून सर्वसमावेशक योजना; ग्राहकांना रु.1.81 लाखांपर्यंत बचतीची संधी



इसुझू मोटर्स इंडियाने इसुझू डी-मॅक्स एस-कॅबसाठी नवीन भाडेपट्टा योजना जाहीर केली आहे. व्यवसाय मालक आणि वाहन ताफा चालकांना वाहन मालकीच्या अतिरिक्त जबाबदाऱ्यांशिवाय अधिक सोयीस्कर आणि किफायतशीर पर्याय उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही योजना सादर करण्यात आली आहे.

टिकाऊपणा, विश्वासार्हता आणि उत्कृष्ट कामगिरीसाठी ओळखल्या जाणाऱ्या इसुझू डी-मॅक्स एस-कॅबसाठी ही सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. वाहन भाडेपट्टा पद्धतीकडे वाढता कल लक्षात घेऊन ग्राहकांना अधिक सुलभ आणि स्मार्ट पर्याय देण्यावर कंपनीने भर दिला आहे.

कंपनीच्या मते, या योजनेमुळे मोठी प्रारंभिक गुंतवणूक टाळता येणार असून वाहनाचे अवमूल्यन आणि पुनर्विक्रीशी संबंधित चिंता कमी होणार आहेत. तसेच रोख प्रवाहाचे नियोजन अधिक सुलभ होऊन आधुनिक आणि विश्वासार्ह वाहन ताफ्याचे व्यवस्थापन सोपे होणार आहे.

इसुझू मोटर्स इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक राजेश मित्तल यांनी सांगितले की, "भारतीय बाजारपेठ आमच्यासाठी अत्यंत महत्वाची आहे. या नवीन भाडेपट्टा सुविधेमुळे जपानी गुणवत्ता आणि टिकाऊपणासाठी प्रसिद्ध असलेली इसुझूची व्यावसायिक वाहने उद्योजकांसाठी अधिक सहज उपलब्ध आणि किफायतशीर ठरतील."

उपव्यवस्थापकीय संचालक ताकेशी हिरानो म्हणाले, "ही योजना ग्राहकांसाठी अधिक लवचिक आणि स्मार्ट पर्याय ठरेल. वाहन मालकीशी संबंधित पारंपरिक अडथळे दूर करून व्यवसायांना अधिक कार्यक्षमतेने प्रगती करण्यास मदत होईल."

इसुझू डी-मॅक्स एस-कॅबमध्ये 2.5 लिटर क्षमतेचे इंटरकूल्ड डिझेल इंजिन देण्यात आले असून ते 5 गतीच्या हस्तचलित गिअर प्रणालीसह उपलब्ध आहे. वाहनात मोठी मालवाहतूक क्षमता, मजबूत स्टील रचना, टिकाऊ सस्पेन्शन आणि उत्कृष्ट इंधन बचत क्षमता देण्यात आली आहे.

याशिवाय आरामदायी आसन व्यवस्था, चालकासाठी सहा प्रकारे समायोजित करता येणारी आसन व्यवस्था, धूळ व परागकण फिल्टरयुक्त वातानुकूलन प्रणाली, विविध वस्तू ठेवण्याची सोय आणि माहिती दर्शक पडदा यांसारख्या सुविधा देण्यात आल्या आहेत.

कंपनीच्या मते, या उपक्रमामुळे व्यवसाय वाढीसाठी आवश्यक आर्थिक लवचिकता मिळून ग्राहकांना अधिक आत्मविश्वासाने व्यवसाय विस्तार करता येणार आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी जवळच्या इसुझू विक्री केंद्राशी संपर्क साधावा.

## NEET पेपरफुटी घोटाळ्यामागे मोठे रॅकेट सक्रिय

**नागपूर (दै. संध्या) :**

देशभरात खळबळबळ उडवून देणारे नीट (NEET) परीक्षा पेपरफुटीचे प्रकरण अत्यंत गंभीर असून, यामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्यावर आणि मानसिकतेवर मोठा आघात झाला आहे. वारंवार घडणाऱ्या अशा घटना थांबवण्यासाठी आता केवळ वरवरचे बदल करून चालणार नाही, तर संपूर्ण शिक्षण व्यवस्थेतच अमूलाग्र बदल करण्याची वेळ आली आहे," असे खळबळजनक प्रतिपादन भाजप नेते अशोक चव्हाण यांनी नागपुरात केले. या संपूर्ण घोटाळ्यामागे मोठे रॅकेट सक्रिय असून पैसे कमावण्याचा हा धंदा झाला असल्याची टीकाही त्यांनी केली. नागपूर दौऱ्यावर असताना अशोक चव्हाण यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी नीट परीक्षा, आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे वाढलेली महागाई आणि राज्यातील आगामी राजकीय समीकरणांवर सविस्तर भाष्य केले. शिक्षण प्रणालीतील त्रुटींवर बोट ठेवत अशोक चव्हाण म्हणाले की, "लाखो विद्यार्थी ज्या परीक्षेत बसतात, त्या सिस्टीममध्ये नक्कीच काही उणिवा आहेत. प्रश्नपत्रिका जशाच्या तशा बाहेर येणे आणि तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करून कॉपी करणे हा गंभीर प्रकार आहे. सीबीआय या प्रकरणी वेगाने तपास करत असून, सरकारने या घोटाळ्याची पाळेमुळे खणून काढण्याचे काम सुरू केले आहे. अनेक जिल्हाधिकाऱ्यांनी कॉपीविरुद्ध चांगली मोहीम राबवली, परंतु दुर्दैवाने पुढे याद्या बदलून त्यात हस्तक्षेप केला जातो आणि काही संस्थांना अभय मिळते.

# दररोज बदाम सेवनाने प्रीडायबिटीज असलेल्या व्यक्तींमध्ये मेंदू व चयापचय आरोग्य सुधारण्यास मदत : नवा अभ्यास

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**



**जर्नल ऑफ न्यूट्रिशनमध्ये प्रकाशित संशोधनात महत्त्वपूर्ण निष्कर्ष**

आहारातील छोटासा बदलही आरोग्यावर मोठा सकारात्मक परिणाम करू शकतो, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. जर्नल ऑफ न्यूट्रिशनमध्ये प्रकाशित झालेल्या नव्या अभ्यासानुसार, दररोज बदाम सेवन केल्याने प्रीडायबिटीज असलेल्या मध्यम वयीन आशियाई भारतीय प्रौढांमध्ये मेंदूची कार्यक्षमता, रक्तातील साखर नियंत्रण आणि चयापचय आरोग्यात सुधारणा होऊ शकते.

जगभरात सुमारे ६० कोटींहून अधिक लोक प्रीडायबिटीजने प्रभावित असून ही स्थिती केवळ टाइप-२ मधुमेहाचाच नव्हे, तर मेंदूच्या कार्यक्षमतेतील घटेचाही धोका वाढवते. या पार्श्वभूमीवर नवी दिल्ली येथे २४ आठवड्यांचा अभ्यास करण्यात आला.

या संशोधनात ४० ते ६० वर्षे वयोगटातील प्रीडायबिटीज असलेल्या ६० आशियाई भारतीय प्रौढांचा समावेश करण्यात आला होता. सहभागींची दोन गटांमध्ये विभागणी करण्यात आली. नियंत्रण गटाने नियमित संतुलित आहार घेतला, तर दुसऱ्या गटाला दररोज सुमारे ३२ ते ४२ ग्रॅम बदामांचा समावेश असलेला समान कॅलरीचा आहार देण्यात आला.

अभ्यासादरम्यान सहभागींचे नियमित निरीक्षण करण्यात आले. सुरुवातीला आणि शेवटी मेंदूची कार्यक्षमता, रक्तातील साखर, HbA1c, वजन, BMI, कोलेस्ट्रॉल आणि कंबरेचे मापन यांचे परीक्षण करण्यात आले.

अभ्यासाच्या शेवटी बदाम सेवन करणाऱ्या गटात निर्णयक्षमता, माहिती प्रक्रिया गती आणि एकूण मेंदू कार्यक्षमतेत सुधारणा दिसून आली. तसेच उपाशीपोटी आणि जेवणानंतरच्या रक्तातील साखरेची पातळी तसेच HbA1c मध्येही सकारात्मक बदल आढळले.

याशिवाय वजन, शरीरातील चरबी, BMI, कंबरेचा घेर, एकूण कोलेस्ट्रॉल आणि LDL कोलेस्ट्रॉलमध्ये घट झाल्याचेही संशोधकांनी नमूद केले आहे. सूज (इन्फ्लेमेशन) आणि ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेसशी संबंधित संकेतकांमध्येही सुधारणा दिसून आली.

नवी दिल्लीतील फोर्टिस-सीडॉक सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर डायबिटीज, मेटाबॉलिक डिसीजेस अँड एंडोक्रिनोलॉजीचे अध्यक्ष डॉ. अनूप मिश्रा यांनी सांगितले की, "दररोज थोड्या प्रमाणात बदामांचा आहारात समावेश केल्यास मेंदू आरोग्य सुधारण्यास मदत होऊ शकते. तसेच रक्तातील साखर नियंत्रण आणि वजन व्यवस्थापनातही सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत."

रितिका समद्दार यांनी सांगितले की, प्रीडायबिटीज आणि जीवनशैलीशी संबंधित आजार वाढत असताना बदामांसारखा साधा आहार पर्याय मेंदू आणि चयापचय आरोग्यासाठी उपयुक्त ठरू शकतो.

डॉ. सीमा गुलाटी यांनी स्पष्ट केले की, बदाम सेवन करणाऱ्या गटात सूज आणि ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेसचे स्तर कमी झाले, तर संरक्षणात्मक अँटीऑक्सिडंट असलेल्या व्हिटॅमिन E चे प्रमाण वाढले.

एका औंस (२८ ग्रॅम) बदामांमध्ये ६ ग्रॅम प्रथिने, ४ ग्रॅम फायबर, १३ ग्रॅम असंतृप्त मेद आणि केवळ १ ग्रॅम संतृप्त मेद असतो. तसेच मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि व्हिटॅमिन E यांसह २४ आवश्यक पोषक घटक आढळतात.

तज्ज्ञांच्या मते, बदाम थेट खाण्यासोबतच सिरीअल, दही, सॅलड आणि विविध पदार्थांमध्येही सहज समाविष्ट करता येतात.

## आमची टॉफी आंतरराष्ट्रीय मंचावर पोहोचली!

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इटली दौऱ्यातील एक अतिशय गोड प्रसंग सध्या जगभरातील सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी आणि पंतप्रधान मोदी यांच्यातील मेलोडी या लोकप्रिय सोशल मीडिया ट्रेंडला आता थेट पारले मेलोडी टॉफीची जोड मिळाली आहे. पंतप्रधान मोदींनी मेलोनी यांना पारले कंपनीची प्रसिद्ध मेलोडी टॉफी गिफ्ट केली आणि या व्हिडिओने अवघ्या काही तासांत १०० मिलियन व्ह्यूजचा टप्पा पार केला. या ऐतिहासिक मेलोडी मोमेंटवर आता मेलोडी टॉफी बनवणारी भारतातील दिग्गज कंपनी पारले प्रॉडक्ट्सने प्रतिक्रिया दिली आहे. आपली टॉफी थेट आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीचा भाग बनल्याचे पाहून पारले कंपनीने आपल्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर हा व्हिडिओ शेअर केला आणि कंपनीने कॅप्शनमध्ये, आम्ही १९८३ पासून नात्यांमध्ये गोडवा आणत आहोत असं म्हटलं.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender Notice (3rd Call)**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors on Mahatransco SRM e-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following works.

| Sr. No. | Matter to be displayed on website (English) | Start Date & Time of tender (DD/MM/YYYY HH:MM) (Time with AM/PM) | Last Date & Time of Submission (DD/MM/YYYY HH:MM) (Time with AM/PM) |
|---|---|---|---|
| 1 | Annual civil maintenance of substations under jurisdiction of EHV CCCM Sub division-I, Pune (**RFx No. 7000040001**) | 21/05/2026 (16.00 PM) | 31/05/2026 (16.00 PM) |
| 2 | Annual civil maintenance of staff quarters/ colony buildings under jurisdiction of EHV CCCM Sub division-Pimpari Chinchwad, Pune (**RFx No. 7000040002**) | 21/05/2026 (16.00 PM) | 31/05/2026 (16.00 PM) |

For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in**
**Tender copy per tender 590/-**
**Contact Person:**
**The Addl. Executive Engineer (C), Tel. No.8010653137.**

Sd/-
Executive Engineer (C)
EHV CCCM Division, Pune
MSETCL, Pune - 411011.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### उत्तम दंडीमे यांना मानद डॉक्टरेट प्रदान

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड शहरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते उत्तम गोविंदराव दंडीमे यांना वृंदावन धाम (मथुरा), उत्तर प्रदेश येथील पं. दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठाची "विद्यावाचस्पती" सारस्वत (मानद डॉक्टरेट) ही मानाची पदवी प्रदान करण्यात आली आहे. नवी दिल्ली येथिल हॉटेल रेडिसन ब्ल्यु येथे आयोजित करण्यात आलेल्या पदवी प्रदान सोहळ्यात जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालयाचे प्रा. डॉ. सुधीर कुमार आर्या हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच पंडित दीनदयाळ उपाध्याय हिंदी विद्यापीठाचे कुलपती डॉ. इंदु भूषण मिश्र "देवेंदु" यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा संपन्न झाला. यावेळी दिल्ली शिक्षाबोर्ड प्रमुख डॉ. रेखा चव्हाण या उपस्थित होत्या. उत्तम दंडीमे यांचे साहित्य आणि समाजसेवा क्षेत्रातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील योगदान याची नोंद घेऊन त्यांचा सन्मान करण्यात आला आहे. तसेच हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठान, मराठवाडा प्रतिष्ठान व आर्य समाज पिंपरी, पुणे या संस्थांचे सक्रिय सभासद व पदाधिकारी आहेत. खडकी येथील ५१२ आर्मी बेस वर्कशॉप येथून सेवा निवृत्त झाले आहेत. वयाच्या ७० व्या वर्षी दंडीमे यांना मिळालेला सन्मान तरुणांना प्रेरणादायी आहे.

### मंगलाताई कदम यांची राष्ट्रवादी पक्षामधून हकालपट्टी करा - रवींद्र ओव्हाळ

पिंपरी (दैनिक संध्या) : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांच्याकडे पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी झोपडपट्टी सेलचे अध्यक्ष रवींद्र ओव्हाळ यांनी



माजी महापौर मंगलाताई कदम यांची पक्षातून हकालपट्टी करावी अशी मागणी केली आहे. सोमवारी मंगलाताई कदम यांचा एक कथित व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसारित झाला आहे. यामध्ये त्यांनी मागील काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षविरोधी काम केल्याची अप्रत्यक्षरीत्या कबुली दिली आहे. नुकत्याच झालेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीमध्ये त्यांनी त्यांच्या मुलाला भाजपाची उमेदवारी मिळवून देऊन जाहीरपणे प्रचार केला आहे. याची पक्षप्रमुख म्हणून सुनेत्रा अजितदादा पवार यांनी गंभीर दखल घेऊन मंगलाताई कदम यांच्यावर बडतर्फीची कारवाई करून त्यांची पक्षातून त्वरित हकालपट्टी करावी अशी मागणी या पत्रात करण्यात आली आहे. या पत्रावर खजिनदार दीपक साकोरे, सेवादल शहराध्यक्ष ज्ञानेश्वर मोरे, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष संजय अवसरमल, पदवीधर सेल अध्यक्ष प्रदीप औटी आणि वाहतूक सेल अध्यक्ष विनोद वरखेडे यांनी देखील सह्या केल्या आहेत, तसे पत्र रवींद्र ओव्हाळ यांनी प्रसिद्धीस दिले आहे.

### सोशल मीडियावरील 'बनावट लोन ॲप'पासून सावधान; पोलिसांचे नागरिकांना आवाहन

पिंपरी (दैनिक संध्या) : सोशल मीडियावर 'इन्स्टंट लोन' देण्याच्या नावाखाली नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या बनावट लोन ॲप्सचा सुळसुळाट वाढला असून, नागरिकांनी अशा ॲप्सपासून सावध राहावे, असे आवाहन सायबर पोलिस स्टेशन, पिंपरी चिंचवड यांच्या वतीने करण्यात आले आहे. सायबर पोलिसांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, गुन्हेगार सोशल मीडियाद्वारे तात्काळ कर्ज मिळण्याचे आमिष दाखवून नागरिकांना लिंक पाठवतात. त्या लिंकवर क्लिक केल्यानंतर मोबाईलमध्ये बनावट लोन ॲप डाउनलोड होते. हे ॲप इन्स्टॉल करताना संपर्क क्रमांक, फोटो, लोकेशन आणि इतर वैयक्तिक माहितीची परवानगी घेतली जाते. यानंतर नागरिकांना अल्प रकमेचे कर्ज देऊन त्यांच्याकडून जादा व्याजाची मागणी केली जाते. पैसे न दिल्यास मोबाईलमधील फोटो आणि संपर्क माहितीचा गैरवापर करून बदनामी करण्याची धमकी दिली जाते. काही प्रकरणांमध्ये फोटो मॉर्फ करून व्हॉट्सअ‍ॅपद्वारे नातेवाईकांना पाठवण्याचे प्रकारही घडत असल्याचे पोलिसांनी सांगितले. सायबर पोलिसांनी नागरिकांना कोणतेही लोन ॲप डाउनलोड करण्यापूर्वी त्याची विश्वासार्हता तपासण्याचा सल्ला दिला आहे. तसेच अनोळखी APK फाईल्स किंवा लिंकवर क्लिक करू नये, मोबाईलमधील अनावश्यक परवानग्या देऊ नयेत आणि ॲपचे रिव्ह्यू व रेटिंग तपासूनच वापर करावा, असेही सांगण्यात आले आहे. फसवणुकीचा संशय आल्यास तात्काळ राष्ट्रीय सायबर हेल्पलाईन क्रमांक १९३० वर संपर्क साधावा किंवा www.cybercrime.gov.in या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### नीट पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ संभाजी ब्रिगेडकडून आरसीसीच्या फलकाची तोडफोड

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरात नीट पेपरफुटी प्रकरणाचे पडसाद उमटू लागले असून, आरसीसी क्लासेसचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर यांच्या आरसीसी फलकाची संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांकडून तोडफोड करण्यात आली. संभाजी ब्रिगेड पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सतीश काळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचाराविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. या वेळी संभाजी ब्रिगेडचे पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष सतिश काळे पुणे जिल्हा कार्याध्यक्ष भैय्यासाहेब गजधने, ब्रह्मानंद जाधव, प्रसाद दौंडकर उपस्थित होते. नीट -यूजी 2026 पेपरफुटी प्रकरणात आरसीसी क्लासेसचे संस्थापक प्रा. शिवराज मोटेगावकर यांना सीबीआयने अटक केल्यानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. मोटेगावकर हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध कोचिंग संस्थांपैकी एक असलेल्या आरसीसीचे प्रमुख आहेत. लातूर पॅटर्नमधील मोठे नाव म्हणून त्यांची ओळख होती. मात्र, पेपरफुटी प्रकरणात त्यांचे नाव समोर आल्यानंतर विद्यार्थ्यांसह पालकांमध्येही तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.




# हवेली ग्रामीणमधील १३ गावे पिंपरी-चिंचवड शहर नगर भूमापन कार्यालयाशी जोडणार..!

## राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मान्यता; भाजपा आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा


**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील बोपखेल, दिघी, वडमुखवाडी, चऱ्होली, चोवीसावाडी, डुडुळगाव, मोशी, चिखली, देहू, किन्हई, रावेत, मामुर्डी आणि किवळे या गावांना नगर भूमापन कार्यालय, पिंपरी-चिंचवड यांच्याशी संलग्न करण्यास महसूल विभागाने मान्यता दिली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यास मंजुरी दिल्याने परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

यापूर्वी ही गावे हवेली ग्रामीण भूमी अभिलेख कार्यालयाशी संलग्न असल्यामुळे जमीन मोजणी, प्रॉपर्टी कार्ड तसेच विविध अभिलेख कामांसाठी नागरिकांना वारंवार हवेली कार्यालयात जावे लागत होते. त्यामुळे वेळ आणि पैशांचा मोठा अपव्यय होत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात होती.

भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी या संदर्भात महसूल मंत्री बावनकुळे यांच्याकडे पाठपुरावा केला होता. 18 मार्च 2025 रोजी दिलेल्या निवेदनात त्यांनी संबंधित गावे नगर भूमापन कार्यालय, पिंपरी-चिंचवड यांच्याशी संलग्न करण्याची मागणी केली होती.

या प्रस्तावावर मंत्रीस्तरावर स्वाक्षरी झाल्याचे सांगण्यात येत असून, अधिकृत आदेश लवकरच जारी होण्याची शक्यता आहे.





या निर्णयामुळे संबंधित गावांतील नागरिकांना जमीन मोजणी, प्रॉपर्टी कार्ड, अभिलेख दुरुस्ती आदी सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहेत. परिणामी शासकीय कामकाज अधिक सुलभ होऊन नागरिकांची पायपीट थांबणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

दरम्यान, या निर्णयाबद्दल आमदार महेश लांडगे यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले असून, "पिंपरी-चिंचवडकरांच्या हितासाठी सरकारने सकारात्मक भूमिका घेतली आहे," अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

> "पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना जमीन मोजणी, प्रॉपर्टी कार्ड आणि भूमी अभिलेखाच्या कामांसाठी हवेली कार्यालयात जावे लागत होते. त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. आता संबंधित गावे नगर भूमापन कार्यालय, पिंपरी-चिंचवड यांच्याशी संलग्न करण्याचा निर्णय झाल्याने नागरिकांची पायपीट थांबणार असून वेळ आणि पैशांची बचत होणार आहे. सर्व शासकीय सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय ठरणार आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.
>
> – महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# पिंपरी चिंचवड शहरातील अनधिकृत इंटरनेट व टी.व्ही. केबल्स ऑपरेटर्सना महापालिकेचा इशारा

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यावरील दिवाबत्ती व्यवस्थेच्या महानगरपालिकेच्या खांबांवरून काही संस्था व व्यक्तींनी टी.व्ही. केबल तसेच इंटरनेटसंबंधित केबल्स अनधिकृतपणे ओढल्याचे निदर्शनास आले आहे. या केबल टाकण्यापूर्वी महानगरपालिकेची कोणतीही पूर्वपरवानगी घेण्यात आलेली नसून, महापालिकेकडून अशा प्रकारची कोणालाही परवानगी देण्यात आलेली नाही, असे विद्युत विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



महापालिकेच्या खांबांवरून अनधिकृतपणे ओढण्यात आलेल्या इंटरनेट व टी.व्ही. केबल्समुळे दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच या केबल्समुळे महानगरपालिकेच्या विद्युत खांबांचे व त्यावरील विद्युत व्यवस्थेचे नुकसान झाल्याच्या घटनाही घडल्या असून, यामुळे सार्वजनिक सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या अनधिकृत केबल्समुळे शहराच्या सौंदर्यावरही विपरीत परिणाम होत असून, याबाबत अनेक नागरिक, अशासकीय सेवाभावी संस्था तसेच महानगरपालिकेचे पदाधिकारी व सदस्य यांनी महापालिकेकडे तक्रारी दाखल केल्या आहेत. महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील तरतुदीनुसार, महानगरपालिकेच्या खांबांवर पूर्वपरवानगीशिवाय ओढलेल्या इंटरनेट व टी.व्ही. केबल्स या महानगरपालिकेच्या मालमत्तेवरील अतिक्रमण मानले जाते.

प्रत्यक्षात, कोणतीही केबल टाकण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परवाना विभागाकडून रितसर परवाना घेणे बंधनकारक आहे. तसेच महानगरपालिकेकडून परवाना प्राप्त झाल्यानंतर, पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीद्वारे उभारण्यात आलेल्या 'ऑप्टिकल फायबर केबल' (OFC) नेटवर्कचा वापर करणे अथवा त्या डक्टमधून केबल टाकणे आवश्यक असल्याचेही महापालिकेने स्पष्ट केले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोणतीही नेटवर्क, टी.व्ही. केबल अथवा इतर प्रकारच्या केबल्स टाकण्यासाठी आकाशचिन्ह व परवाना विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याशी संपर्क साधणे बंधनकारक राहणार आहे.

## उद्योग आणि शैक्षणिक संस्था संबंध दृढ करण्यासाठी पीसीसीओईचा पुढाकार

**पिंपरी (दै. संध्या)**

"२०४७ विकसित भारत" हे ध्येय साध्य करण्यासाठी आणि देशाच्या सर्वांगीण विकासासाठी संशोधनाला खूप महत्त्व आहे. त्यासाठी भारतीय अभियंत्यांनी संशोधन क्षेत्रात प्रयत्नपूर्वक आंतर विद्याशाखीय सहकार्याने स्वदेशी नवोपक्रम राबविले पाहिजेत असे आवाहन सीएसआयआर राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. हर्षवर्धन पोल यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये 'क्षितिज २०२६' अंतर्गत पाचव्या 'इनोव्हेटिव्ह प्रोजेक्ट शोकेस कॉन्फरन्स'चे उद्घाटन डॉ. पोल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, पीसीसीओईचे उप संचालक डॉ. निळकंठ चोपडे, डसॉल्ट सिस्टीम कंपनीचे आकृती ग्लोबल कोअर टीम लीडर अनिकेत भांगे, क्षितिज २०२६ चे संयोजक डॉ. राहुल गुजर, डॉ. श्रीनिवास अंबाला, समन्वयक डॉ. रजनी पि. के. आदींसह राज्यभरातील नामांकित कंपनीमधील १५५ उद्योजक प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी सहभागी संशोधकांनी नाविन्यपूर्ण उद्योगाभिमुख पेटंट योग्य २६ प्रकल्पाचे सादरीकरण केले.

यामध्ये मशीन लर्निंग, डेटा सायन्स, स्ट्रक्चरल हेल्थ, सस्टेनेबल एन्व्हायर्नमेंट, रोबोटिक्स अँड ऑटोमेशन, हेल्थकेअर, सिस्टीम इंजिनिअरिंग आणि स्मार्ट चिप यांसारख्या आंतरविद्याशाखीय क्षेत्रांचा समावेश होता. ज्ञानेश्वर लांडगे, पद्माताई भोसले, विठ्ठल काळभोर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते.



## स्वर्गीय आशा भोसले यांना त्यांच्या गीतांमधून आदरांजली!

**पिंपरी (दै. संध्या)**

प्राधिकरणातील गदिमा नाट्यगृहात नंदकुमार कांबळे, विनायक कदम आणि सचिन शेटे आयोजित विविध भारती म्युझिकल इव्हेंटच्या माध्यमातून "पिया तू अब तो आजा" हा हिंदी-मराठी सुमधुर गीतांचा बहारदार कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला रसिक श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी प्रसन्ना वंजारी, प्रीतम वंजारी, मंगेश सोनवणे, विलास गाधडे, मोहन भस्मे, आयोजिका मोहिनी जाधव, विकास जगताप, मल्लिकार्जुन इंगळे, ऋचा गांगल, निळकंठ निमगावकर, राजेंद्र शिंदे, परमेश्वर घाडगे, मुकेश चौधरी, नेहा चौधरी, फ्रेंड्स ट्रेकिंग क्लब अध्यक्ष वसंत ठोंबरे, रंजनाताई ठोंबरे, जयसिंग कांबळे, विश्वास सोहनी, वंदनाताई सोहनी, पोलिस उप निरीक्षक संतोष माळी, गणेश लोढ, प्रकाश पवार, प्रकाश येवला व आदी मान्यवर उपस्थित होते.

"पिया तू अब तो आजा" या कार्यक्रमात नंदकुमार कांबळे, विनायक कदम, राजेंद्र पगारे, चंद्रकांत हिवरकर, शैलेंद्र पाटील, उत्तम जाधव, शुभांगी पवार, नेहा दंडवते, डॉ. आरोही पाटे, डॉ. संदीप गायकवाड, स्वाती पाटील, अनिल जंगम, पंकज कथलकर आणि डॉ. कविता बोंडे या गायक-कलाकारांनी आपल्या सुमधुर आवाजात हिंदी व मराठी गीते सादर केली. रसिक श्रोत्यांनी प्रत्येक गीताला उत्स्फूर्त दाद देत अनेक गाण्यांना "वन्स मोअर"ची मागणी केली.

'चांदणे शिंपीत जा', 'धुंदीत गाऊ', 'फिटे अंधाराचे जाळे' या मराठी गीतांसह 'पिया तू अब तो आजा', 'रेशमाच्या रेघांनी', 'जीना क्या अजी प्यार बिना' यांसारखी गाजलेली गीते सादर करण्यात आली.

## पिंपरी-चिंचवडमध्ये पेट्रोल पंप बंद असल्याची अफवा, नागरिकांनी पंपावर गर्दी न करण्याचे पेट्रोल डीलर असो.चे आवाहन

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील ८० टक्के पेट्रोल पंप बंद असल्याच्या चर्चेमुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, या सर्व चर्चा केवळ अफवा असून शहरातील पेट्रोल पंप नियमित सुरू असल्याचे स्पष्टीकरण पेट्रोल डीलर असोसिएशनचे अध्यक्ष ध्रुव रुपारेल यांनी दिले आहे.

गेल्या दोन दिवसांपासून शहरात इंधन तुटवडा निर्माण होणार, तसेच अनेक पेट्रोल पंप बंद राहणार असल्याच्या अफवा सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात पसरल्या होत्या. या चर्चांमुळे नागरिकांनी पेट्रोल पंपांवर मोठी गर्दी करण्यास सुरुवात केली होती. अनेक ठिकाणी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले.



याबाबत स्पष्टीकरण देताना ध्रुव रुपारेल यांनी सांगितले की, "पिंपरी-चिंचवड शहरातील ८० टक्के पेट्रोल पंप बंद असल्याची माहिती पूर्णपणे चुकीची आहे. काही ठिकाणी तांत्रिक किंवा स्थानिक कारणांमुळे एखादा पेट्रोल पंप तात्पुरता बंद असू शकतो. मात्र, शहरात इंधनाचा पुरवठा नियमित सुरू असून कोणतीही टंचाई नाही." तसेच नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी टाळावी, असे आवाहनही असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे. प्रशासनाकडूनही नागरिकांना संयम बाळगण्याचे आणि केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आरटीओमध्ये 'एनके' मालिकेच्या आकर्षक क्रमांकांसाठी अर्ज प्रक्रिया जाहीर

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड उप प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे लवकरच दुचाकी वाहनांसाठी सुरु होणाऱ्या 'एनके' या मालिकेतील आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित तीनपट शुल्क भरून हवे असतील; अशा चारचाकी वाहन मालकांनी २० मे रोजी सकाळी ११ ते दुपारी २.३० वाजेपर्यंत विहित नमुन्यात अर्ज करावा.

दुचाकी मालिकेतील उर्वरित आकर्षक नोंदणी क्रमांक दुचाकी वाहनांसाठी आरक्षित करण्यासाठी २१ मे रोजी सकाळी ११ ते दुपारी २.३० वा. विहित नमुन्यातील अर्ज सादर करावा. अर्ज कार्यालयाच्या नवीन वाहन नोंदणी विभागात धनाकर्ष (डीडी), पत्त्याचा




पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह आधारकार्डला लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकासह जमा करावा. हा डीडी 'डी.वाय.आर.टी.ओ., पिंपरी चिंचवड' यांच्या नावे राष्ट्रीयकृत, अनूसचित बँकेचा पुणे येथील असावा. अर्जदाराने ओळख पटविण्यासाठी अर्जासोबत फोटो ओळखपत्र तसेच पत्त्याच्या पुराव्यासाठी आधारकार्ड, दूरध्वनी देयक आदींची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

चारचाकी वाहनांसाठी क्रमांकांची यादी २१ मे रोजी सकाळी कार्यालयीन सूचना फलकावर लावण्यात येईल. यादीतील अर्जदारांना लिलावासाठी जास्त रकमेचा डीडी जमा करावयाचा असल्यास त्याच दिवशी दुपारी २.३० वाजेपर्यंत सीलबंद पाकिटात कार्यालयात जमा करावा. तसेच दुपारी ३.३० वाजता सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कक्षात नोंदणी प्राधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संबंधित अर्जदारांसमोर लिफाफे उघडून विनिर्दीष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केला असेल त्या अर्जदारास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाणार आहे.

दुचाकीची यादी २२ मे रोजी कार्यालयीन सूचना फलकांवर लावण्यात येईल. दुचाकीसाठी अर्जदारांना लिलावाकरीता जास्त रकमेचा डीडी जमा करावयाचा असल्यास २२ मे रोजी दुपारी २.३० पर्यंत सीलबंद पाकिटात कार्यालयात जमा करावा. त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कक्षात नोंदणी प्राधिकारी यांच्या उपस्थितीत लिफाफे उघडून जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केलेल्या अर्जदारास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाणार आहे. वाहन क्रमांक आरक्षित केल्याचे संदेश मोबाईलवर आल्यानंतर पाचव्या दिवशी पावती कार्यालयातून मिळणार आहे, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी कळविले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### तळवलकर लिखित 'री-अलाईन : अ वूमन्स गाईड टू होलिस्टिक हेल्थ' पुस्तकाचे प्रकाशन

जेजुरी(दैनिक संध्या) : पुणे व नीरा येथे गेली ३३ वर्षे यशस्वी होमिओपॅथी वैद्यकीय सेवा देणारे होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ. अभय तळवलकर यांनी महिलांच्या आरोग्यावर आधारित 'Re-align... A Woman's Guide to Holistic Health' हे पुस्तक लिहिले आहे.हे पुस्तक सेलिब्रिटी न्यूट्रिशनिस्ट लक काऊटीन् यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. मुंबई येथील ताज लांड्स एंड येथे हा प्रकाशन सोहळा पार पडला. महिलांच्या आयुष्यातील विविध टप्प्यांमध्ये उद्भवणाऱ्या आरोग्य समस्यांवर या पुस्तकात सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. पौगंडावस्था, गर्भधारणा, फायब्रॉइड्स, रजोनिवृत्ती (Menopause) तसेच महिलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याशी संबंधित अनेक महत्त्वाच्या विषयांचा या पुस्तकात समावेश आहे. महिलांच्या आरोग्याविषयी सामान्य लोकांमध्ये योग्य जागरूकता निर्माण व्हावी व महिलांच्या आरोग्याकडे सर्वांगीण दृष्टीकोनातून पाहण्यास मदत व्हावी, हा या पुस्तकामागील मुख्य उद्देश आहे. सामान्य वाचकांसाठी सोप्या भाषेत लिहिलेले हे पुस्तक महिलांच्या आरोग्याविषयी अधिक चांगल्या प्रकारे समज निर्माण करण्यास निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा प्रतिसाद

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर केलेल्या 'इंधन बचत आणि पर्यावरण संवर्धन' या आवाहनाला प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी पर्यावरणपूरक जीवनशैलीचा आदर्श घालून दिला आहे. त्यांनी आपल्या दैनंदिन वापरासाठी इलेक्ट्रिक कारचा स्वीकार करत हरित ऊर्जा आणि स्वच्छ पर्यावरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. इलेक्ट्रिक कारच्या वापरासोबतच त्यांनी आपल्या ताफ्यातील वाहनांची संख्या देखील कमी केली आहे. "जागतिक ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनासह इंधन बचत ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. छोट्या-छोट्या कृतींमधूनही मोठा बदल घडवून आणता येतो" असा संदेश उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार यांनी आपल्या कृतीतून दिला आहे.

### आर्टी मार्फत मोफत 'जेईई'-'नीट' पूर्व प्रशिक्षण ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

नारायणगाव (दैनिक संध्या) : अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मार्फत राज्यातील अनुसूचित जातीतील मातंग व त्यातील तत्सम जातींच्या विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शिक्षणासाठी जेईई (JEE) आणि नीट (NEET) या प्रवेश परीक्षांचे मोफत अनिवासी ऑफलाईन प्रशिक्षण नामांकित खाजगी संस्थांमार्फत दिले जाणार आहे. यासाठी पात्र उमेदवारांकडून विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन आर्टीचे व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे यांनी केले आहे. सन 2026-27 ते 2027- 28 या दोन वर्षांच्या कालावधीसाठी हे प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षण कालावधीत विद्यार्थ्यांना दरमहा 6 हजार रुपये विद्यावेतन, एक वेळ पुस्तक संचाकरीता 5 हजार रुपये तसेच नामांकित कोचिंग क्लासेसची पुर्ण फी त्या संस्थेला दिली जाणार आहे.

### अल्पवयीन विद्यार्थिनीचा हात पकडून लगट करण्याचा प्रयत्न, पॉक्सो अंतर्गत गुन्हा

लोणी काळभोर (दैनिक संध्या) : हवेली तालुक्यातील थेऊर परिसरात अकरावीत शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन मुलींची छेडछाड केल्याची घटना उघडकीस आली आहे. "तु खूप सुंदर दिसतेस" असे म्हणत हात पकडून तिच्याशी लगट करण्याचा प्रयत्न करणारावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पीडित मुलीच्या ४० वर्षीय आईने दिलेल्या फिर्यादीवरून अक्षय साहेबराव चव्हाण (रा. जय मल्हार ढाब्याशेजारी, थेऊर, ता. हवेली, जि. पुणे) याच्याविरुद्ध लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी शाळेत जात असताना अक्षय चव्हाण याने तिचा हात पकडत "तु खूप सुंदर दिसतेस" असे म्हणत तिच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आठ दिवसांनी पुन्हा एकदा शाळेत जात असताना दादा गायकवाड यांच्या घराजवळ तो तिच्या जवळ गेला. त्याने तिचा हात पकडून तिला स्वतःकडे ओढले व तिच्या मनाला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले आहे. तसेच, "ही बाब कोणाला सांगितली तर तुझ्या वडिलांना ठार मारून टाकीन," अशी धमकी दिली आहे.

# वाल्हे परिसरातील ओढे, नाले, बंधारे कोरडे ठणठणीत

वाल्हे (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील वाल्हे परिसरात प्रखर उन्हामुळे जलयुक्त शिवार योजना तथा कृषी खात्यांतर्गत बांधण्यात आलेले बंधारे पाण्याअभावी कोरडे ठणठणीत पडल्याने शेती व्यवसाय पूर्णतः अडचणीत आला असून पिण्याच्या पाण्याची टंचाई देखील निर्माण होणार असल्याची भिती सर्वसामान्य वर्गामधून व्यक्त केली जात आहे.

वाल्हे सह परिसरातील काही गावांना तसेच वाड्या वस्त्यांना दरवर्षी पाणीटंचाई ला सामोर जावे लागते .आजही अंबाजीचीवाडी मुकदमवाडी वागदरवाडी आदी भागात शासनाचे पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरु आहेत.परंतु याकडे स्थानिक प्रशासनाने टँकर मुक्त होण्यासाठी आजपर्यंत कोणतीच उपाययोजना राबविली नसल्याचे वास्तव पहायला मिळत आहे.



त्यातच शासनाने पाण्याच्या पातळीत वाढ व्हावी यासाठी ठिकठिकाणी ओढे नाले रुंदीकरण खोलीकरण तसेच लघु बंधारे बांधले खरे परंतु एकही बंधाऱ्यात आजमितीस थेंब भर पाणी उरले नसल्याने लवकरच या भागात जलसंकट ओढावणार असल्याचे चित्र स्पष्ट आहे.

एकीकडे पुरंदर तालुक्यात पाण्याचे राजकारण करूनच राजकीय नेते नेहमीप्रमाणे स्वत:ची पोळी भाजून घेताना दिसतात. परंतु संपूर्ण तालुका दुष्काळमुक्त होण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून प्रतीक्षेत असणाऱ्या गुंजवणी प्रकल्पाला देखील जुन्या सर्व्हेचे ग्रहण लागल्याने गुंजवणी प्रकल्प लांबणीवर पडणार कि काय ? असा सवाल देखील नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे,

अशातच पिंगोरी जलाशया व्यतिरिक्त आडाचीवाडी बापसाई वस्ती गिरमे मळा मुलाणकी तसेच चाहूर कामठवाडी दातेवाडी पिसुर्टी वागदरवाडी सुकलवाडी आदी भागातील ओढे नाले तसेच बंधारे पाण्याअभावी कोरडे ठाक पडल्याने शेती व्यवसाय संकटात सापडला असून या भागातील शेतकरी पुरता हवालदिल झाला आहे.

त्यातच प्रखर उन्हाचा व उद्भवलेल्या पाणी टंचाई चा फटका पोल्ट्री तसेच चिकन व्यावसायिकांना देखील बसू लागला आहे. उष्माघाताने पक्षांची मर दिवसेंदिवस वाढू लागल्याने त्यांचेही धाबे दणाणले आहेत.

## दोन रोहित्र फोडून ऑइल चोरी

निरगुडसर (दै. संध्या)

भराडी (ता.आंबेगाव) येथील घोडनदीच्या किनारी असलेल्या गावडेमळा जवळ दोन रोहित्र अज्ञात चोरट्यांनी मंगळवार (ता.१९) रोजी मध्यरात्री फोडली यामध्ये महावितरण कंपनीचे १ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे,ही चोरीची घटना बुधवार (ता.२०) रोजी सकाळी ९ वाजता उघडकीस आली. तसेच ऐन उन्हाळ्यात शेतकऱ्यांचे कृषीपंप बंद झाल्याने शेतकरी संकटात सापडला आहे,तरी महावितरण कंपनीने तातडीने रोहित्र दुरुस्त करण्याची मागणी भराडी येथील शेतकऱ्यांनी केली आहे. भराडी येथील घोडनदीकाठी गावडे मळा जवळ दोन रोहित्र आहेत,या ठिकाणाहून २५ ते ३० शेतकऱ्यांना कृषीपंपासाठी वीज पुरवठा केला जातो.सध्या थ्री फेज वीज दिवसा उपलब्ध असून रात्रीची सिंगल फेज वीज असते यामुळे थ्रीफेज बंद असल्या कारणाने वीज गेली तरी कृषीपंपाकडे रात्रीच्या वेळी कोणी शेतकरी फिरकत नाही याचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी मंगळवारी मध्यरात्री पोलवरून दोन रोहित्र खाली पाडले आणि यामधील १०० के.व्ही रोहित्रामधील २१० आणि २०० के.व्ही मधील २४० लिटर ऑइल असे एकूण दोन्ही मधील ४५० लिटर ऑइल आणि आदी नुकसान केले यामध्ये अंदाजे १ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती निरगुडसर वीज मंडळाचे वीजअभियंता नितेश बसारकर यांनी दिली.

## फोटोग्राफर प्रतीक यादव यांचे 'सनस्ट्रोक' व हृदयविकाराच्या झटक्याने निधन

पिंपळी (दै. संध्या)

पिंपळी येथील एक उमदा,कष्टाळू आणि मनमिळाऊ तरुण फोटोग्राफर प्रतीक तानाजी यादव (वय २९, रा. पिंपळी) यांचे मंगळवार, दिनांक १९ मे २०२६ रोजी दु:खद निधन झाले. वॉटर पार्कमध्ये फिरायला गेले असताना तीव्र उष्माघात (सनस्ट्रोक) झाल्याने त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला,ज्यामध्ये त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या या अचानक जाण्याने संपूर्ण पिंपळी परिसर आणि मित्रपरिवारावर शोककळा पसरली आहे.फोटोग्राफी क्षेत्रात अल्पावधीतच मिळवले होते मोठे



नाव प्रतीक यांचे वडील हे मूळचे शेतकरी आहेत.घरात शेतीची पार्श्वभूमी असतानाही,प्रतीक (सन्नी) यांनी आपल्या अंगभूत कलेच्या जोरावर फोटोग्राफी क्षेत्रात पदार्पण केले होते. अत्यंत कमी वयात त्यांनी आपल्या उत्कृष्ट फोटोग्राफीच्या जोरावर परिसरात स्वतःचा मोठा नावलौकिक आणि ब्रँड निर्माण केला होता.व्यावसायिक कौशल्यासोबतच केवळ आपल्या स्वभावामुळे त्यांनी प्रचंड मोठा मित्रसमुदाय जोडला होता. 'फोटोग्राफी करणे आणि माणसे जोडणे' हे त्यांचे मुख्य कसब होते.वॉटर पार्कमध्ये घडली दुर्दैवी घटना मिळालेल्या माहितीनुसार, प्रतीक हे आपल्या मित्रांसोबत वॉटर पार्कमध्ये फिरण्यासाठी गेले होते. मात्र,सध्या सुरू असलेल्या कडक उन्हाच्या तीव्रतेमुळे त्यांना अचानक 'सनस्ट्रोक' (उष्माघात) चा मोठा फटका बसला.त्यानंतर अचानक हृदयविकाराचा झटका (हार्ट फेल) आल्याने त्यांची तब्येत खालावली आणि त्यातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.एका हसत्या-खेळत्या तरुणाचा असा अचानक अंत झाल्याने त्यांचे कुटुंबीय आणि मित्रांना मोठा धक्का बसला आहे. कुटुंबियांवर कोसळला दुःखाचा डोंगर प्रतीक (सन्नी) यादव यांच्या पश्चात आई, वडील, आजी, आजोबा आणि एक विवाहित बहीण असा मोठा परिवार आहे. एकुलत्या एक तरुण मुलाच्या निधनाने शेतकरी पित्यासह संपूर्ण यादव कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## तलाव परिसरात पुन्हा मोटार-केबल चोरी

■ औटीवाडीतील शेतकरी पुन्हा चोरट्यांच्या निशाण्यावर

औटीवाडीतील शेतकरी आरोपींना अटक न झाल्यास उपोषणाचा इशारा

श्रीगोंदा (दै. संध्या)

या प्रकरणी शेतकऱ्यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक अनिल (महाराज) औटी, नगरसेवक दादा औटी, आबा औटी, संदीप जगन्नाथ औटी, गणेश औटी, अंकुश औटी, छगन लबडे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी श्रीगोंदा पोलीस निरीक्षकांना निवेदन देत आठ दिवसांत आरोपींना अटक न झाल्यास श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. याबाबतचे निवेदन अहिल्यानगर पोलीस अधीक्षक तसेच श्रीगोंदा तहसीलदार यांनाही देण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक आहरे यांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला असून, पुढील तपास श्रीगोंदा पोलीस करत आहेत.

श्रीगोंदा येथील शहरालगतच्या औटीवाडी येथील काळभैरव तलाव परिसरात पुन्हा एकदा मोटारी व तांब्याच्या केबल चोरीची मोठी घटना घडली असून, चोरट्यांनी तब्बल ३६ शेतकऱ्यांच्या मोटारींना जोडलेल्या तांब्याच्या केबल कापून चोरी केल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीती व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या चोरीमध्ये अंदाजे १५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून, याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवार (दि. १८ मे २०२६) रोजी रात्री औटीवाडी परिसरातील शेतकरी ऊस व इतर पिकांना पाणी देत होते. गावात रात्री ९ ते पहाटे ५ वाजेपर्यंत वीजपुरवठा सुरू असल्याने अनेक शेतकरी मोटारी सुरू करून शेतात पाणी देण्यासाठी गेले होते. दरम्यान, मध्यरात्री सुमारे १ वाजण्याच्या सुमारास काही शेतकऱ्यांच्या मोटारी अचानक बंद पडल्या. त्यानंतर शेतकऱ्यांनी तलाव परिसरात पाहणी केली असता मोटारींना जोडलेल्या तांब्याच्या केबल अज्ञात चोरट्यांनी कापून चोरी केल्याचे निदर्शनास आले.

दरम्यान, शेतात पाणी देत असलेले अण्णा रूपचंद औटी व नितीन शेळके हे मोटार बंद पडल्याने मोटारसायकलवरून तलाव परिसराकडे पाहणी करण्यासाठी गेले असता त्यांना संशयास्पद पांढऱ्या रंगाची कार दिसून आली. ग्रामस्थ जवळ येत असल्याचे लक्षात येताच कारचालकाने वाहन भरधाव वेगाने वाडीच्या दिशेने पळवले. यावेळी अण्णा औटी व नितीन शेळके यांनी मोटारसायकलवरून कारचा पाठलाग केला. पाठलागादरम्यान संशयित वाहनाचा क्रमांक एमएच १२ एनएक्स ६२६६ असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

त्यानंतर त्यांनी तातडीने अंकुश हिरडे यांना फोन करून माहिती दिली. माहिती मिळताच अंकुश हिरडे यांनी औटीवाडीजवळ संशयित वाहन आडवण्याचा प्रयत्न केला. मात्र, कारचालकाने त्यांच्या अंगावर वाहन घालण्याचाही प्रयत्न केल्याचे सांगण्यात आले. संतप्त झालेल्या हिरडे यांनी वाहनाच्या दिशेने दगड फेकला, मात्र चोरटे भरधाव वेगाने आढळगावच्या दिशेने पसार झाले.

या चोरीत आनंदा औटी, अंकुश हिरडे, अंकुश औटी, गणेश औटी तसेच नगरसेवक दादा औटी यांच्यासह सुमारे ३६ शेतकऱ्यांच्या मोटारींना जोडलेल्या तांब्याच्या केबल चोरीला गेल्या आहेत. विशेष म्हणजे, मागील दीड वर्षांपासून याच तलाव परिसरात सातत्याने मोटारी व वीज केबल चोरीच्या घटना घडत असून लाखो रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला आहे. दोन महिन्यांपूर्वीही याच परिसरातील मोटारी चोरीला गेल्याची घटना घडली होती. मात्र, अद्याप एकाही आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आलेले नाही.

औटीवाडी गावातील काळभैरव तलावातून सुमारे १४० शेतकरी शेतीसाठी पाणी वापरतात. वारंवार होणाऱ्या चोरीमुळे परिसरातील शेतकरी भीतीच्या छायेखाली असून, शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

## चाकणला शिवसंस्कार शिबिरातील विजेत्यांना पारितोषिकांचे वाटप



चाकण (दै. संध्या)

किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानच्या वतीने शौर्यभूमी श्री संग्राम दुर्ग किल्ल्यात आयोजित करण्यात आलेल्या शिवसंस्कार शिबिरातील विजेत्यांना पारितोषिकांचे वाटप करण्यात आले. प्रारंभी श्री. दामोदर पूजन, श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे आणि शस्त्र पूजन किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. किरण झिंजुरके, डॉ. संदीप महिंद गुरुजी, राहुल वाडेकर, योगेश साखरे, राजू दिक्षित, भाऊसाहेब फुके, वसंत थिगळे, सचिन मोरखंडे आदींच्या हस्ते करण्यात आले. शिबिरामध्ये सहभागी झालेल्या प्रशिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. संस्कार, शिस्त, राष्ट्रप्रेम व शिवचरित्राचे महत्त्व याविषयी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. प्रात्यक्षिकांद्वारे विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य सादर केले. लेझीम, योगासन, विविध मर्दानी खेळ व शिवकालीन युद्धकला यांचीही यावेळी प्रात्यक्षिके घेण्यात आली. संगमनेर येथील शहागड किल्ल्यावर विद्यार्थ्यांना दुर्ग अभ्यासासाठी नेण्यात आले.

## मेडिकल दुकाने दिवसभर बंद

लोणी काळभोर (दै. संध्या)

ऑनलाईन औषध विक्री तसेच मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांकडून दिल्या जाणाऱ्या अवाजवी सवलती आणि बनावट औषधांच्या वाढत्या विक्रीमुळे किरकोळ औषध व्यवसाय संकटात सापडल्याच्या निषेधार्थ बुधवार (२० मे) रोजी हवेली तालुक्यातील लोणी काळभोर आणि कदमवाकवस्ती परिसरातील औषध विक्रेत्यांनी एकदिवसीय मेडिकल बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यामुळे दिवसभर मेडिकल दुकाने बंद राहिल्याने औषध बाजारपेठेवर शुकशुकाट पसरल्याचे चित्र पाहायला मिळाले. 'ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट अँड ड्रगिस्ट' तसेच 'महाराष्ट्र स्टेट केमिस्ट्स अँड ड्रगिस्ट्स असोसिएशन' यांच्या आवाहनानुसार हा देशव्यापी बंद पुकारण्यात आला होता. लोणी काळभोरसह कदमवाकवस्ती परिसरातील विक्रेत्यांनीही या आंदोलनात सहभागी होत दुकाने बंद ठेवून सरकारच्या धोरणांविरोधात नाराजी व्यक्त केली.

## चक्रेश्वर पतसंस्थेच्या अध्यक्षपदी संदीप कानपिळे

चाकण (दै. संध्या)

रौप्यमहोत्सवी वर्षाकडे यशस्वीपणे वाटचाल सुरू असलेल्या आणि ऑडिट वर्ग अ मिळालेल्या चाकण, राणुबाई मळा येथील चक्रेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी संदीप मधुकर कानपिळे यांची, तर उपाध्यक्षपदी अनिल गोसावी यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

हेमंत बिरदवडे यांनी आपल्या अध्यक्षपदाचा, तर अक्षय केळकर यांनी उपाध्यक्ष पदाचा नियोजित कालावधी पूर्ण झाल्याने स्वखुशीने राजीनामा दिला होता. त्यामुळे ही दोन्ही पदे रिक्त झाली होती.

संस्थेच्या कार्यालयात अध्यक्ष व उपाध्यक्ष या दोन्ही पदासाठी निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. अध्यक्षपदासाठी कानपिळे यांनी, तर उपाध्यक्ष पदासाठी गोसावी यांनी अर्ज दाखल केला होता. या दोन्ही पदासाठी इतर कोणाचेही अर्ज आले नसल्याने अध्यक्षपदी कानपिळे यांची तर, उपाध्यक्षपदी गोसावी यांची निवड झाल्याचे मावळते अध्यक्ष हेमंत बिरदवडे व संस्थेचे संस्थापक



"चक्रेश्वर पतसंस्थेस ऑडिट वर्ग मिळाला असून, संस्थेच्या वतीने यापूर्वी सभासदांना नऊ टक्के लाभांश वाटप करण्यात आला आहे. संस्थेचे संस्थापक ज्ञानेश्वर केळकर यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे कामकाज पारदर्शकपणे सुरू असून, कर्जाचे व्याजदर कमी करण्यात आले आहेत. सभासदांनी कर्ज घेऊन व्याज दराचा लाभ घेतला पाहिजे."

- संदीप कानपिळे, अध्यक्ष, चक्रेश्वर पतसंस्था, चाकण

ज्ञानेश्वर केळकर यांनी घोषित केले. याप्रसंगी संस्थेचे संचालक लता घुमटकर, राजाराम जाधव, सविता शेवकरी, सुरेश बिरदवडे, योगेश लेंडघर, अक्षय केळकर, प्रमोद साळुंखे, रामदास बिरदवडे, सर्जेराव गोरे उपस्थित होते. संदीप कानपिळे यांची अध्यक्षपदी, तर अनिल गोसावी यांची उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल माजी सरपंच दत्तात्रय बिरदवडे, नगरसेवक हर्षद लेंडघर,

नगरसेवक विकास धाडगे, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते पांडुरंग गोरे, चाकण पतसंस्थेचे संचालक निलेश टिळेकर, उद्योजक हनुमंत मेदनकर, मधुकर कानपिळे आदींच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

प्रियंका केळकर - जाधव व सचिव जाहिरा मुंढे यांनी सर्वांचे स्वागत केले.

## सीलिंगच्या जमिनी विक्रीचा मार्ग मोकळा

पुणे (दै. संध्या) : राज्य शासनाच्या कमाल जमीन धारणा कायद्यांतर्गत मिळालेल्या जमिनी (सीलिंगच्या) आता वर्ग 2 मधून वर्ग 1 मध्ये रूपांतरित करून विकणे शक्य होणार आहे. त्यासाठी जमिनीच्या रेडीरेकनर मूल्याच्या क्षेत्रानुसार 30 किंवा 25 टक्के रक्कम भरून ही विक्री करता येणार आहे. मात्र, ही जमीन राज्य सरकारने ज्याला दिली आहे, त्याच्याच नावावर किंवा परवानगी घेऊन दुसऱ्याच्या नावावर केलेली असावी. राज्य सरकारने या जमिनींच्या विक्रीबाबत हा महत्त्वाचा आणि दिलासादायक निर्णय घेतल्याने अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सीलिंग जमिनींच्या खरेदी-विक्रीचा मार्ग मोकळा झाला आहे. पूर्वी सीलिंगच्या जमिनींची खरेदी-विक्री करताना 50 टक्के रक्कम भरून वर्ग 2 या दर्जावरच विक्रीची परवानगी दिली जात असे. मात्र, राज्य सरकारने आता काढलेल्या नवीन राजपत्रात या तरतुदीत बदल केला आहे.

## जुनी शाळा इमारत होणार ज्ञानाचे भांडार



नारायणगाव (दै. संध्या)

सावरगाव तालुका जुन्नर येथील जुनी शाळा इमारत माजी विद्यार्थ्यांची 'अस्मिता' आहे.या शाळेच्या इमारतीने अनेक पिढ्या ज्ञानगंगेच्या प्रवाहात आणल्या. "अज्ञानाचा अंधकार दूर करून, ज्ञानाचा प्रकाश देणारी ही एकमेव पवित्र शाळा ठरली".हा या गावाचा नावलौकिक केला."काळी शाळा म्हणजे चार पिढ्यांच्या आठवणींची शिदोरी आहे'. ते जुने शिक्षक आणि ते विद्यार्थी यांचे नाते आजही ताजेतवाने वाटते आहे"!

गेल्या अनेक वर्षापासून या जुन्या शाळेची इमारत मोडकळीस आहे. या शाळेच्या जागेत भव्य दिव्य ग्रंथालय उभारण्याची संकल्पना माजी विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतून अमलात येत आहे.

" ग्रंथालय हे केवळ पुस्तकांचा संग्रह नाही. तर ते मानवी बुद्धिमत्ता आणि कल्पकतेला एकत्र आणणारे विचाराचे केंद्र आहे" हा प्रगल्भ विचार असणारे गावातील तरुण एकत्र आलेत."गावाला मंदिरे जेवढी महत्त्वाची आहेत, त्या ही पेक्षा भव्यदिव्य ग्रंथालय अधिक महत्त्वाची आहेत. "मंदिरे ही संस्कृतीचे ज्ञान देतात. तर ग्रंथालय ही संस्कार करतात"!" ग्रंथालय म्हणजे भूतकाळ ,वर्तमान आणि भविष्यातील ज्ञानाचा अमूल्य ठेवा आहे. !" अशा भावनेने सर्व माजी विद्यार्थ्यांनी वज्रमूठ बांधली आहे.

सावरगाव येथील भव्य दिव्य ग्रंथालय हे सावरगावच्या पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांसाठी करिअर सिद्ध करण्याचे पवित्र स्थान ठरेल. अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास या ग्रंथालयात बसून करतील. "ज्या खोलीत पुस्तके असतात. ती खोली कधीच रिकामी नसते., तिथे जगातील सर्वोत्तम मित्र असतात". याची जाणीव नवीन पिढीतील विद्यार्थ्यांना येईल.

या भव्यदिव्य ग्रंथालयातून सावरगावच्या पंचक्रोशीतील अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेतून आपले करिअर करून क्लास वन अधिकारी घडावेत .या शुद्ध हेतूने माजी विद्यार्थी संघटनेने हा संकल्प केला आहे.अशी भावना संघटनेचे लोकप्रिय मित्र सुरेश भागवत यांनी व्यक्त केली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## कृष्णा-भीमा पूर वळण योजनांना गती द्या - जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील

मुंबई (दैनिक संध्या) : सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील पूरस्थितीवर दीर्घकालीन नियंत्रण मिळवण्यासाठी प्रस्तावित कृष्णा-भीमा पूर वळण योजनांना व्यापक जनहित लक्षात घेऊन या प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश मंत्री विखे-पाटील यांनी दिले. मंत्रालयात जलसंपदा मंत्री तथा गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळाचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली याबाबत बैठक पार पडली. कृष्णा उपखोऱ्यातील पुराचे पाणी भीमा उपखोऱ्यात वळविण्याच्या प्रस्तावावर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. पूरनियंत्रणासोबतच दुष्काळी भागांना दिलासा देण्याच्या दृष्टीने या योजनेचे महत्त्व असाधारण असल्याचे मंत्री विखे-पाटील यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या वाट्याच्या पाण्याचा प्रभावी वापर, सर्वेक्षण व सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याच्या कामांचाही यावेळी मंत्री विखे पाटील यांनी आढावा घेतला. प्रकल्पासाठी आवश्यक तांत्रिक बाबी, प्रशासकीय मान्यता आणि पुढील कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी मंत्री विखे पाटील यांनी केल्या. बैठकीस ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांच्यासह गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक, मुख्य अभियंते तसेच संबंधित विभागीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीने उपस्थित होते. पूर नियंत्रण आणि जलसंपत्तीचे प्रभावी व्यवस्थापन करण्याच्यादृष्टीने या बैठकीत बैठक महत्त्वपूर्ण चर्चा झाली.

## राज्यातील 15 जिल्ह्यांतील 633 गावे, 1652 वाड्यांमध्ये 706 टँकरद्वारे पाणीपुरवठा

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यात वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे अनेक भागांमध्ये पाणीटंचाईची समस्याअसून नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये यासाठी शासनाने विविध जिल्ह्यांत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवला आहे. दिनांक ११ मे ते १७ मे २०२६ दरम्यानच्या कालावधीतील अहवालनुसार राज्यातील १५ जिल्ह्यांतील ६३३ गावे आणि १६५२ वाड्यांमध्ये एकूण ७०६ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या टँकरमध्ये ३३ शासकीय तर ६६९ खासगी टँकरचा समावेश आहे. वाढत्या तापमानामुळे विहिरी, बोअरवेल आणि लहान पाणीस्त्रोत कोरडे पडू लागल्याने अनेक ग्रामीण भागांमध्ये टँकर हा नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याचा प्रमुख आधार ठरत आहे. ठाणे विभागात सर्वाधिक १७७ गावे आणि ५७२ वाड्यांमध्ये १५५ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तर नाशिक विभागात १५६ गावे आणि ४४४ वाड्यांसाठी १५९ टँकर कार्यरत आहेत. पुणे विभागात १४५ गावे आणि ५७२ वाड्यांमध्ये १३१ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात १३८ गावे आणि ६४ वाड्यांसाठी एकूण २४४ टँकर कार्यरत असून राज्यातील सर्वाधिक टँकर या विभागात वापरण्यात येत आहेत. अमरावती विभागात १७ गावांसाठी १७ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. नागपूर विभागात सध्या कोणत्याही ठिकाणी टँकरची आवश्यकता भासलेली नाही. राज्यातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर संबंधित जिल्हा प्रशासन, ग्रामपंचायती आणि पाणीपुरवठा विभाग यांच्याकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. नागरिकांना नियमित आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत असून टँकर पुरवठ्याबरोबरच पर्यायी जलस्रोतांचा वापर, विहिरींचे अधिग्रहण आणि जलसाठ्यांचे नियोजन यावरही भर दिला जात आहे. आगामी काळात तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने पाणीटंचाईग्रस्त भागांमध्ये आवश्यकतेनुसार अतिरिक्त टँकर उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.




## एअरटेलने 'प्रायोरिटी पोस्टपेड' सेवा सुरु केली ग्राहकांना उत्कृष्ट नेटवर्क अनुभवाचा लाभ

नवी दिल्ली (दैनिक संध्या) : भारती एअरटेलने आज 'प्रायोरिटी पोस्टपेड' ही नवी सेवा सुरू करण्याची घोषणा केली. ही सेवा 5G स्लायसिंग तंत्रज्ञानाचा वापर करून पोस्टपेड ग्राहकांना उत्कृष्ट आणि सातत्यपूर्ण नेटवर्क अनुभव प्रदान करते. काम, मनोरंजन किंवा ऑनलाइन सहयोगासाठी अखंड कनेक्टिव्हिटीवर अवलंबून असलेल्या व्यस्त ग्राहकांसाठी ही सेवा विशेषतः विकसित करण्यात आली आहे. या सेवेसाठी एअरटेलने आपल्या 5G नेटवर्कमध्ये स्लायसिंग तंत्रज्ञानाच्या प्रगत क्षमतांसह सुधारणा केली आहे. यामुळे नेटवर्क अधिक कार्यक्षम बनते; अधिक क्षमता निर्माण होते; तसेच ही क्षमता विशिष्ट पद्धतीने वापरून प्रायोरिटी ग्राहकांना उत्कृष्ट अनुभव देणे शक्य होते. नेटवर्क क्षमतेचे बुद्धिमत्तापूर्ण आणि गतिशील विभाजन करून, एअरटेल उच्च ट्रॅफिकच्या परिस्थितीतही पोस्टपेड ग्राहकांना स्थिर, विश्वासार्ह आणि सातत्यपूर्ण अनुभव देत आहे. गेल्या वर्षभरात अमेरिका, सिंगापूर, युनायटेड किंगडम आणि मलेशिया यांसारख्या अनेक देशांमध्ये स्लायसिंग-आधारित 5G सेवा सुरू करण्यात आल्या आहेत. भारतातील अशा प्रकारची ही एअरटेलची पहिलीच सेवा असून, अधिक स्मार्ट, सक्षम आणि भविष्यकालीन डिजिटल नेटवर्क उभारण्यासाठी एअरटेल करत असलेल्या सातत्यपूर्ण गुंतवणुकीचे हे प्रतीक आहे. तसेच प्रगत तंत्रज्ञान आणि ग्राहक-केंद्रित नवकल्पना यांची सांगड घालण्याच्या कंपनीच्या वचनबद्धतेलाही हे अधोरेखित करते. या लाँचबाबत प्रतिक्रिया देताना एअरटेलचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) शश्वत शर्मा म्हणाले, "एअरटेलमध्ये आमचा भर ग्राहकांचा अनुभव अधिक समृद्ध करणाऱ्या अर्थपूर्ण नवकल्पना सादर करण्यावर आहे. 5G स्लायसिंग तंत्रज्ञानावर आधारित 'प्रायोरिटी पोस्टपेड' ही आमची नवीनतम सेवा आहे. वाहतुकीत अडकून ग्राहक संवादात सहभागी होताना, गर्दीच्या संगीत कार्यक्रमात थेट प्रक्षेपणाचा आनंद घेताना किंवा गजबजलेल्या बाजारात टॅक्सी बुक करताना ग्राहकांना अधिक दर्जेदार, विश्वासार्ह आणि अखंड अनुभव देण्यासाठी ही सेवा तयार करण्यात आली आहे." एअरटेलची 'प्रायोरिटी' सेवा कंपनीच्या सर्व पोस्टपेड प्लॅन्सवरील ग्राहकांसाठी उपलब्ध आहे.

# मध्य रेल्वेचा प्रवाशांना दिलासा! बेंगळुरू-मुंबई एक्स्प्रेसला कर्जतचा थांबा, २० मे पासून बुकिंग सुरू

रोहा (दै. संध्या)

रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी आणि महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही राज्यांमधील संपर्क अधिक वाढवण्यासाठी रेल्वे प्रशासनातर्फे सर एम. विश्वेश्वरय्या टर्मिनस बेंगळुरू (SMVB) आणि लोकमान्य टिळक टर्मिनस (LTT) दरम्यान नियमित 'द्विसाप्ताहिक एक्सप्रेस' सेवा सुरू करण्यात येत आहे. विशेष म्हणजे या गाडीला रायगड जिल्ह्यातील कर्जत रेल्वे स्थानकात थांबा देण्यात आला असून, याचा मोठा फायदा जिल्ह्यातील आणि परिसरातील प्रवाशांना होणार आहे.

गाडी क्रमांक १६५५३/१६५५४ एसएमव्हीबी बेंगळुरू - लोकमान्य टिळक टर्मिनस द्विसाप्ताहिक एक्सप्रेस ही सेवा २४ मे २०२६ पासून लोकमान्य टिळक टर्मिनस येथून नियमितपणे दर रविवार आणि बुधवारी सुरू होईल. गाडी क्रमांक १६५५४ लोकमान्य टिळक टर्मिनस येथून दर रविवार आणि बुधवारी रात्री २३:१५ वाजता सुटेल आणि बेंगळुरू येथे दुसऱ्या दिवशी रात्री २२:३० वाजता पोहोचेल.

तर परतीच्या प्रवासात गाडी क्रमांक १६५५३ एसएमव्हीबी बेंगळुरू - लोकमान्य टिळक टर्मिनस द्विसाप्ताहिक एक्सप्रेस २३ मे २०२६ पासून बेंगळुरू येथून दर शनिवार आणि मंगळवारी धावेल. गाडी क्रमांक १६५५३ बेंगळुरू येथून शनिवार आणि मंगळवारी रात्री २०:३५ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी रात्री २०:४० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल.

या एक्सप्रेस गाडीला प्रवाशांच्या सोयीसाठी ठाणे, कल्याण, कर्जत, लोणावळा, पुणे, लोणंद, सातारा, कराड, सांगली, मिरज जंक्शन, बेळगावी, धारवाड, एस.एस. एस. हुबळी जंक्शन, करजगी, दावणगेरे आणि सम्पिगे रोड हे महत्त्वाचे थांबे देण्यात आले आहेत.




### 20 मे पासून आरक्षण सुरू

गाडी क्रमांक १६५५४ च्या तिकिटांचे आरक्षण (बुकिंग) बुधवार, २० मे पासून सर्व तिकीट खिडक्यांवर आणि ऑनलाईन पद्धतीने सुरू झाले आहे. प्रवाशांनी या नवीन गाडीच्या वेळापत्रकाची नोंद घ्यावी आणि या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाने केले आहे.

## शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीमधील तांत्रिक विसंगती दूर करण्याची कार्यवाही करा - कृषि मंत्री भरणे

मुंबई (दै. संध्या)

राज्यातील कृषि क्षेत्राच्या डिजिटलायझेशनसाठी केंद्र व राज्य शासनामार्फत फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला आहे. बीड जिल्ह्यातील गेवराई विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीमधील तांत्रिक विसंगती संबधित सर्व यंत्रणांनी दूर कराव्यात, असे निर्देश कृषि मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

विधानसभा सदस्य विजयसिंह पंडीत यांनी शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीमधील तांत्रिक विसंगती दूर करण्याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती यासंदर्भात बैठकीत कृषि मंत्री दत्तात्रय भरणे बोलत होते. यावेळी आमदार विजयसिंह पंडित, सचिव परिमल सिंह, व्हिसीव्दारे कृषि आयुक्त सूरज मांढरे,ॲग्रीस्टॅकचे संचालक अंकुश माने, उपसचिव श्रीकांत आंडगे, यासह बीड जिल्ह्यातील अधिकारी बैठकीला उपस्थित होते.



कृषि मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, गेवराई विधानसभा मतदार संघातील फार्मर आयडी संदर्भातील त्रुटींवर तातडीने संबधित सर्व कार्यान्वयिन यंत्रणांनी तातडीने कार्यवाही करावी. शेतकऱ्यांच्या ८ अ उताऱ्यावरील क्षेत्राची नोंद फार्मर आयडीवर घ्यावी. मोबाईल नंबर जर चुकीचा असल्यास त्यात दुरूस्ती करावी.

ज्या शेतकऱ्यांच्या नावावर जमीन आहे त्याचेच क्षेत्र नोंद करावी. या तांत्रिक अडचणी दूर करून लवकरात लवकर या परिसरातील शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवावा.या अडचणी सोडविण्यासाठी विशेष कॅम्पचे सर्व विभागांच्या समन्वयातून शिबीर आयोजित करून प्रश्न सोडवावा असे निर्देश त्यांनी दिले.

## जिल्हा निर्यात प्रचालन समितीची बैठक संपन्न

पुणे (दै. संध्या)

जिल्ह्यातील उत्पादनांची निर्यात वाढविण्याच्या दृष्टीने केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, कार्यक्रम आणि धोरणांबाबत उद्योजकांना व्यापक माहिती मिळावी यासाठी माहिती व मार्गदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करावे, अशा सूचना अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा निर्यात प्रचालन समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी परकीय व्यापार महासंचालनालयाचे जाईंट डीजीएफटी बिश्वास बी.एन., जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक अर्चना कोठारी, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक योगेश पाटील यांच्यासह निर्यात क्षेत्राशी संबंधित विविध विभागांचे अधिकारी तसेच उद्योग संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



श्री. राऊत म्हणाले, केंद्र शासनाच्या निर्यात प्रोत्साहन मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील उत्पादनांचा विचार करता निर्यात वाढीसाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्यवाही करावी. अधिकाधिक उद्योजक निर्यात क्षेत्रात पुढे येण्यासाठी प्रयत्न करावेत. जिल्ह्यातील निर्यातदारांची माहिती संकलित करून त्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करावे. तसेच नव्या उद्योजकांना निर्यात प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीत निर्यात प्रोत्साहन मोहीम तसेच 'ट्रेड कनेक्ट ई-प्लॅटफॉर्म' बाबत सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली. डीजीएफटीकडून प्राप्त सूचनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्या अनुषंगाने वेळोवेळी बैठका आयोजित करून आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

प्रास्ताविकानंतर जिल्हा उद्योग केंद्राच्या व्यवस्थापिका श्रीमती पल्लवी वाडेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.


## 'गेटवे'ची बेस्ट बस सेवा बंद पाडण्याचा डाव

मुंबई (दै. संध्या)

गेट वे ऑफ इंडियाची बेस्ट बस सेवा बंद पाडण्याचा डाव बेस्ट समितीने सोमवारी हाणून पाडला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या पत्रानंतर बेस्ट प्रशासनाने सोमवारी येथील बेस्ट थांबा स्थलांतराचा प्रस्ताव समितीत मांडला. मात्र सदस्यांनी याला तीव्र आक्षेप नांदवला. गेट वे ऑफ इंडियावर जाण्यासाठी शेअर टॅक्सीला परवानगी मग बेस्ट बसेसला बंदी का असा संताप व्यक्त केल्यानंतर हा प्रस्ताव बेस्टच्या अध्यक्षांनी अखेर परत पाठवला.

देश आणि विदेशातून येणारे पर्यटक व मुंबईकर यांना गेट वे ऑफ इंडिया येथे जाण्यासाठी बेस्टची छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस समोरील डेपोतून आणि चर्चगेट रेल्वे स्थानकासमोरून ए- 112 आणि ए-116 या दोन बस गाड्यांची सेवा दिली जाते. याचा फायदा सर्वसामान्य प्रवाशांना तसेच दक्षिण मुंबईत नोकरी धंद्यासाठी प्रवास करणाऱ्यांनाही होत असतो.

त्यामुळे हे दोन्ही मार्ग बेस्टचे फायद्याचे मार्ग म्हणून ओळखले जातात. असे असताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी 11 मार्च रोजी बेस्ट महाव्यवस्थापकाना पत्र पाठवत गेटवे जवळील हा थांबा पुढे म्युझियम समोरील जागेत स्थलांतरित करावा, अशी सूचना केली आहे. या पत्राच्या अनुषंगाने बेस्ट प्रशासनाने समितीसमोर हा प्रस्ताव सोमवारी सादर केला.



त्यावर समिती सदस्य नितीन नांदगावकर यांनी जोरदार आक्षेप घेतला. देशभरातून येणारे पर्यटक या बस सेवेचा लाभ घेतात. या बस कधीही रिकाम्या धावत नाहीत. चांगला महसूल मिळत असताना बेस्ट हा बस थांबा का स्थलांतरित करीत आहे, राहुल नार्वेकर यांना टॅक्सीवाल्यांचा एवढा पुळका का ? असा संतप्त सवाल त्यांनी केला.

तसे झाल्यास तीव्र आंदोलन करू असा इशाराही दिला. सुमित अहिर यांनी लाखो लोक या बेस्ट बसने गेट वेला येतात. त्यामुळे हा थांबा स्थलांतरित करू नये अशी मागणी केली. तर प्रवीणा मोरोजकर यांनीही ठरावाला तीव्र विरोध दर्शवला.

लक्षात घेता अखेर गेटवे जवळील शेअर टॅक्सी बंद करून फक्त बेस्ट बस गाड्या सुरू ठेवा, असे सांगत बेस्ट अध्यक्ष तृष्णा विश्वासराव यांनी हा प्रस्ताव परत पाठवला. त्यावरही सदस्यांनी आक्षेप घेत हा प्रस्तावच नामंजूर करा, असा आग्रह नितीन नांदगावकर यांनी केला. मात्र मी आता प्रस्ताव रेफर बॅकचा आदेश दिल्याने पुढच्या बैठकीत ठराव परत आल्यावर नामंजूर करू, असे विश्वासराव यांनी शेवटी स्पष्ट केले. बेस्ट बस क्र. ए- 112 आणि ए-116 या दोन्ही बस गाड्यांचा गेट वे जवळील बस थांबा स्थलांतरित करून तो म्युझियम समोरील जागेत हलवा. तसेच प्रवाशांना पुढे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी चौकात थांबा द्या, अशी नार्वेकर यांची सूचना होती.

गेट वे ऑफ इंडियाला जाणाऱ्या बेस्ट बस क्र. ए- 112 आणि ए-116 या दोन्ही बसच्या दररोज 436 फेऱ्यांमधून 24 हजार प्रवासी प्रवास करतात. त्यातून सरासरी एक लाख 17 हजार रुपये इतका महसूल मिळतो. तर दर रविवारी फेऱ्यांची संख्या 598 असते. त्यातून एक लाख 98 हजार इतका महसूल मिळतो.

## ई-चलन संदर्भातील मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेऊ - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई (दै. संध्या)

कोल्हापूर जिल्हा वाहतूकदार समन्वय समितीच्या शिष्टमंडळाने मंत्रालयात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत भेट घेऊन ई-चलन प्रणाली, वेगमर्यादा नियम, एएनपीआर कॅमेरे तसेच दंड आकारणी संदर्भातील विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी वाहतूकदारांच्या मागण्यांबाबत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

बैठकीला परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, माजी आमदार सुजित मिणचेकर यांच्यासह कोल्हापूर जिल्हा वाहतूकदार समन्वय समितीचे अध्यक्ष प्रदीप राठोड, सदस्य मनोज चौगुले, महेंद्र काळभोर, पंकज त्रिपाठी, अशोक शिंदे, गौरव कुसाळे, रफिक रावथर, अशोक कुचकोरवी, राजु ढाले, सुनील मगदुम आदी उपस्थित होते.

शिष्टमंडळाने सादर केलेल्या निवेदनात जुन्या ई-चलनांची सरसकट रद्दबातल, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वेगमर्यादेचा पुनर्विचार, एएनपीआर कॅमेऱ्यांच्या कार्यपद्धतीत सुधारणा, वाहनांमधील अंतराच्या नियमांमध्ये व्यवहार्य बदल तसेच दंडावरील चक्रवाढ पद्धत रद्द करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, वाहतूक व्यवसाय हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे वाहतूकदारांच्या अडचणी शासन गंभीरपणे ऐकत असून, नियमांची अंमलबजावणी करताना अन्याय होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

ई-चलन आणि वेगमर्यादा संदर्भातील तक्रारींबाबत संबंधित विभागांकडून सविस्तर अहवाल मागवून आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल. तसेच, रस्ते सुरक्षा अबाधित ठेवत वाहतूकदारांना दिलासा मिळेल, अशा पद्धतीने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.

कोल्हापूर जिल्हा वाहतूकदार समन्वय समितीच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी या मागण्यांवर तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## राज्यात महिनाभराचा इंधनसाठा; पेट्रोल-डिझेल टंचाईवर भुजबळांचा दावा



मुंबई (दै. संध्या)

अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धामुळे राज्यातील काही भागांमध्ये पेट्रोल, डिझेलसाठी पंपांच्या बाहेर लांब रांगा लागत असताना, राज्यात महिनाभर पुरेल इतका इंधनसाठा आहे, असा दावा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी केला आहे.

राज्यातील काही पेट्रोलपंपांवर इंधनाचा पुरवठा पोहोचण्यास वेळ लागत असेल. पण, पेट्रोल, डिझेल मिळतच नाही, अशी तक्रार अद्याप आली नाही. जर तक्रार आली तर त्यावर कारवाई करण्यात येईल.

पेट्रोल, डिझेलची कमतरता हा जागतिक परिणाम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आपण आभार मानायला हवेत. कारण या अगोदर 27 देशांकडून आपण कच्चे तेल घेत होतो, पण आता अधिक देशांकडून कच्चे तेल आणि इतर गोष्टी घेतल्या जात आहेत, असेही भुजबळ म्हणाले.

शेतकऱ्यांना मिळणार सव्वातीन हजार कोटींची थकबाकी

दरम्यान, धान आणि मका उत्पादक शेतकऱ्यांचे चुकाऱ्यापोटीचे 3 हजार 214 कोटींची थकबाकी तातडीने द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतल्यामुळे अखेरीस हा प्रश्न मार्गी लागला.

भुजबळ म्हणाले, धान आणि मका विक्रीचे हजारो कोटी रुपये अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेले नाहीत. यामुळे राज्यभरातील आमदारांकडून सातत्याने तक्रारी येत होत्या. शेतकऱ्यांना आधी पैसे द्यायचे आणि नंतर केंद्र सरकारकडून ती रक्कम परत मिळवायची, असे धोरण आहे. पण फाईल्स एका टेबलवरून दुसऱ्यावर फिरत होती.

मुख्यमंत्री फडणवीस यांना आपण याबाबत माहिती दिली असता, फडणवीस यांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना फोन करत प्रकरण मार्गी लावण्याचे आदेश दिले, अशी माहिती मंत्री भुजबळ यांनी दिली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### विधी भोरने 42 किलोमीटरची खाडी सात तासात केली पार

नारायणगाव (दैनिक संध्या) : आंबेगाव तालुक्यातील भोरवाडी-अवसरी खुर्द येथील विधी नंदकुमार भोर (वय १३) हिने जलतरण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तिने धामणतर जेटी ते अटल सेतू हे तब्बल ४२ किलोमीटर अंतर अवघ्या ७ तास ३२ मिनिटांत यशस्वीरीत्या पूर्ण करत विक्रमी कामगिरी नोंदवली आहे.हा सन्मान निशांत भगत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. विधीला लहानपणापासूनच जलतरणाची विशेष आवड असून ती सध्या मुंबईतील सानपाडा येथे वास्तव्यास आहे. तिचे प्रशिक्षण डोंबिवली येथील रूपाली रेपाळे स्विमिंग ॲकॅडमीमध्ये सुरू आहे. सोमवारी पहाटे २ वाजून २२ मिनिटांनी विधीने खाडीतून आपल्या जलतरण मोहिमेला सुरुवात केली. अथक प्रयत्न आणि जिद्दीच्या बळावर तिने अटल सेतू परिसरात ही मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केली. विधीचे वडील नंदकुमार भोर हे शेतकरी कुटुंबातील असून सध्या कुटुंब नवी मुंबईत वास्तव्यास आहे. विधी वाशी येथील फादर अँग्नेल स्कूलसध्या इयत्ता आठवीत शिक्षण घेत आहे.

"धामणतर जेटी ते अटल सेतू हे ४२ किलोमीटर अंतर पूर्ण करणे माझ्यासाठी खूप मोठे आव्हान होते. समुद्रातील लाटा, थकवा आणि सातत्य टिकवणे कठीण होते. मात्र प्रशिक्षक रूपाली रेपाळे यांचे मार्गदर्शन, आईवडिलांचा पाठिंबा आणि स्वतःवरील विश्वासामुळे मी ही मोहीम पूर्ण करू शकले. पुढेही देशासाठी मोठ्या स्पर्धांमध्ये यश मिळवण्याचे माझे स्वप्न आहे."

**– विधी नंदकुमार भोर, जलतरणपटू, भोरवाडी अवसरी खुर्द (ता. आंबेगाव)**

### दौंडकरांची आरटीओसाठीची धावपळ थांबणार; राहुल कुल यांचा पाठपुरावा



यवत (दैनिक संध्या) : दौंड तालुक्यातील नागरिकांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली असून, कोविड काळात बंद करण्यात आलेले वाहन परवाना शिबीर (RTO कॅम्प) पुन्हा नियमित सुरू करण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. यासाठी दौंडचे आमदार राहुल कुल यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची मुंबई येथे भेट घेऊन निवेदन सादर केले. दौंड शहर व तालुक्यातील नागरिकांना ड्रायव्हिंग लायसन्स तसेच इतर आरटीओ संबंधित कामांसाठी सध्या बारामती येथे जावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैशाचा मोठ्या प्रमाणावर खर्च होत असून ग्रामीण भागातील युवकांना विशेष त्रास सहन करावा लागत आहे. कोविडपूर्व काळात दौंड येथे नियमित वाहन परवाना शिबिरांचे आयोजन केले जात होते. त्यामुळे स्थानिक नागरिकांची अनेक कामे सहजपणे पूर्ण होत होती. मात्र कोरोना काळात ही सेवा बंद करण्यात आली होती. आता परिस्थिती सामान्य झाल्यानंतरही शिबिर पुन्हा सुरू न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी होती. या पार्श्वभूमीवर आमदार राहुल कुल यांनी परिवहन मंत्र्यांकडे शिबीर तातडीने सुरू करण्याची मागणी केली. यावर मंत्री प्रताप सरनाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद देत दौंड परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी वाहन परवाना शिबीर लवकरच नियमित सुरू करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याची माहिती समोर आली आहे. या निर्णयामुळे दौंड तालुक्यातील हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

### माऊलींच्या रथासाठी रानवडे घराण्याच्या बैलजोडीला मान

आळंदी (दैनिक संध्या) : संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या आषाढी पायीवारी सोहळ्यातील रथासाठी यंदा आळंदीतील रानवडे घराण्याच्या बैलजोडीची निवड करण्यात आली आहे. माऊलींच्या रथासाठी बैलजोडी जुंपण्याचा मान हा परंपरेने कुऱ्हाडे, रानवडे, भोसले, वाहिले, घुंडरे आणि वरखडे या अलंकापुरीतील ग्रामस्थांना दिला जातो. यंदाचा आषाढी पायीवारी प्रस्थान सोहळा ८ जुलै रोजी आळंदीहून पंढरपूरकडे रवाना होणार आहे. या पार्श्वभूमीवर बैलजोडी निवड समितीची विशेष बैठक पार पडली. या बैठकीत प्रगतशील शेतकरी हर्षवर्धन रानवडे आणि तुळशीराम रानवडे यांच्या बैलजोडीला रथ ओढण्याचा मान देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. बैठकीस बैलजोडी समितीचे अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे, उपाध्यक्ष शिवाजीराव रानवडे, विलास घुंडरे, नंदकुमार कुऱ्हाडे, रामदास भोसले, रमेश कुऱ्हाडे उपस्थित होते.

# वीरफाटा ते बोरावकेमळा रस्ता रुंदीकरणाची हालचाल सुरू

**सासवड (दै. संध्या)**



आळंदी - पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग अंतर्गत येणाऱ्या सासवड येथील वीर फाटा ते बोरावके मळा या टप्प्यातील रखडलेल्या रस्ता रुंदीकरणाला आणि भूसंपादन प्रक्रियेला आता वेग येणार आहे. पुरंदर हवेलीचे माजी आमदार संजय जगताप यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे पत्रव्यवहार केला होता. त्यांच्या या पाठपुराव्याला यश आले असून, भूसंपादनाचे काम तांत्रिक अडचणींशिवाय जलदगतीने पूर्ण व्हावे यासाठी स्वतंत्र विशेष भूसंपादन अधिकारी नियुक्त करावा, अशी मागणी सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभागाने पुणे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

वाहतुकीचा वाढता ताण लक्षात घेता, या रस्त्याचा दर्जा प्रमुख जिल्हा मार्ग किंवा राज्य महामार्ग म्हणून श्रेणीसुधारित करण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पासाठी सासवड वीर फाटा ते बोरावके मळा दरम्यानची जमीन मोजणी तातडीने करणे गरजेचे आहे. मोजणी पूर्ण झाल्यानंतरच पुढील कायदेशीर भूसंपादन प्रक्रिया राबवता येणार असल्याने, या संपूर्ण प्रक्रियेवर नियंत्रणासाठी विशेष अधिकाऱ्याची नेमणूक आवश्यक बनली आहे. तसा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अ. रा. भंडारे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला आहे. दरम्यान, या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी आळंदी देवस्थानचे मुख्य विश्वस्त निरंजननाथ महाराज, भाजपचे जिल्हाध्यक्ष शेखर वढणे, गिरीश जगताप, शहराध्यक्ष आनंद जगताप, उदयराज जगताप यांनी प्रयत्न केले.

यासाठी बाधित शेतकरी सचिन रघुनाथ राऊत यांसह ज्ञानेश्वर संताजी जगताप, दामोदर रामभाऊ जगताप, शत्रुघ्न पंढरीनाथ जगताप, ऋषिकेश जयवंत जगताप, प्रमोद मधुकर बोरावके, सूर्यकांत रामचंद्र गिरमे, अनिल मारुती गिरमे, अरुण सुभानराव जगताप, राजेंद्र दत्तात्रय बोरावके, कुमार मारुती जगताप, संतोष सुधाकर गिरमे, प्रदीप काशिनाथ राऊत आणि बाळासाहेब गेनवा बोरावके यांनीही प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.



"या टप्प्यातील रस्त्याची रुंदी कमी असल्याने स्थानिक नागरिक, शेतकरी आणि भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. हा त्रास आणि वाहतूक कोंडी कायमची दूर करण्यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा केला. स्थानिक शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन, ही मोजणी अत्यंत पारदर्शक पद्धतीने पूर्ण केली जाईल आणि त्यानंतर प्रत्यक्ष रस्ता रुंदीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू होईल."

**- संजय जगताप, माजी आमदार**

"रस्त्याच्या रुंदीकरणासाठी आवश्यक असलेले जमीन मोजणी काम तात्काळ सुरू करणे गरजेचे आहे. भूसंपादन प्रक्रियेवर चोख नियंत्रण ठेवण्यासाठी आणि काम गतीने पूर्ण करण्यासाठी आम्ही जिल्हाधिकाऱ्यांना विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याची विनंती केली असून, लवकरच सकारात्मक आदेश मिळतील अशी अपेक्षा आहे."

**- अ. रा. भंडारे, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग**

## जयहिंद पॉलिटेक्निक डिप्लोमा अभियांत्रिकी महाविद्यालयात कॅम्पस प्लेसमेंट

### विविध कंपन्यांकडून विद्यार्थ्यांची निवड

**पुणे (दै. संध्या)**

जयहिंद पॉलिटेक्निक डिप्लोमा अभियांत्रिकी महाविद्यालय येथे यावर्षी भव्य कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह उत्साहात पार पडला असून विविध आघाडीच्या कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या प्लेसमेंटमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन आणि मेकॅट्रॉनिक्स विभागातील विद्यार्थ्यांना विशेष लाभ मिळाला. अशी माहिती तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. एस. आर. पोखरकर यांनी दिली. या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये अनेक नामांकित कंपन्यांनी सहभाग घेत विद्यार्थ्यांना करिअरची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली.

Morade Fruit Pvt. Ltd. यांनी ३२ विद्यार्थ्यांची निवड केली.

CIE Automotive India Ltd. यांनी ३० विद्यार्थ्यांना संधी दिली.

LMT Tools India Pvt. Ltd. यांनी २३ विद्यार्थ्यांची निवड केली.

Larsen & Toubro Ltd. यांनी २२ विद्यार्थ्यांना नियुक्ती दिली.

Hansa Flex Pvt. Ltd. यांनी १५ विद्यार्थ्यांची निवड केली.

Kuebler Automation यांनी ७ विद्यार्थ्यांना संधी दिली.

Sharada Motor Pvt. Ltd. यांनी २४ विद्यार्थ्यांची नियुक्ती केली.

विशेष म्हणजे Tata Motors Passenger Vehicles Ltd. या नामांकित कंपनीने तब्बल १०३ विद्यार्थ्यांची निवड करून सर्वाधिक संधी उपलब्ध करून दिली.

संपूर्ण प्लेसमेंट प्रक्रिया लेखी परीक्षा, तांत्रिक मुलाखत आणि एचआर मुलाखत या टप्प्यांद्वारे पार पडली. विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्य, मेहनत आणि सातत्यपूर्ण तयारीच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले.

या यशस्वी प्लेसमेंटसाठी महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डी. के. आमले यांनी विशेष प्रयत्न केले. उद्योग क्षेत्राशी सातत्यपूर्ण संपर्क, प्रशिक्षण सत्रे, मॉक इंटरव्ह्यू आणि करिअर मार्गदर्शनामुळे हा प्लेसमेंट ड्राइव्ह यशस्वी ठरला.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे जयहिंद शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष जितेंद्र गुंजाळ, सचिव विजय गुंजाळ, खजिनदार धर्मेंद्र गुंजाळ, संचालिका डॉ. शुभांगी गुंजाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. डी. एस. गल्हे व यांनी अभिनंदन केले.

महाविद्यालय प्रशासनाने या यशाबद्दल समाधान व्यक्त केले असून भविष्यात आणखी मोठ्या प्रमाणावर प्लेसमेंट संधी उपलब्ध करून देण्याचा मानस व्यक्त केला आहे. या यशामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला असून त्यांच्या करिअरला भक्कम दिशा मिळाल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

## अवैध गर्भलिंग निदान प्रकरण

### यवत पोलिसांत गुन्हा दाखल

**यवत (दै. संध्या)**

दौंड तालुक्यातील केडगाव परिसरात अवैध गर्भलिंग निदान केल्याचा प्रकार समोर आल्याने एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी यवत पोलीस स्टेशन येथे गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, उपजिल्हा रुग्णालय दौंड येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन विठ्ठल गुजर यांनी फिर्याद दिली आहे. त्यांना केडगाव परिसरात अवैधरित्या गर्भलिंग निदान सुरू असल्याचा एक व्हिडिओ व्हॉट्सअ‍ॅपवर प्राप्त झाला होता. सदर व्हिडिओची प्राथमिक पडताळणी केली असता हा प्रकार बेकायदेशीर गर्भलिंग निदानाशी संबंधित असल्याचे निदर्शनास आले.

या प्रकरणी अण्णासाहेब गिरी( रा. केडगाव ता. दौंड जि.पुणे) यांच्याविरुद्ध गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा कलम 3, 3(अ), 6(ब)(क), 18, 23 व 25 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर घटना दि. 14 मे 2026 रोजी सायंकाळी 5.46 वाजण्याच्या सुमारास केडगाव येथे घडल्याचे नमूद करण्यात आले असून, गुन्ह्याची नोंद दि. 20 मे 2026 रोजी करण्यात आली.

## शिरूर शहरातील विविध भागात दिशादर्शक फलक लावावेत

**शिरूर (दै. संध्या)**

शिरूर शहरातील विविध भागात दिशादर्शक फलक लावावेत तसेच शहरातील महत्त्वाच्या रस्ते, चौक व गल्लीबोळांना नावे देऊन नामफलक उभारावेत, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते प्रीतेश फुलडाळे यांनी सोमवारी नगर परिषद मंगल कार्यालयासमोर उपोषण सुरू केले. गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने पत्रव्यवहार व पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्याने अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे फुलडाळे यांनी सांगितले. शिरूर शहर हे तीन तालुक्यांची प्रमुख बाजारपेठ असून दिवसेंदिवस शहराची लोकसंख्या वाढत आहे. बाहेरगावाहून मोठ्या प्रमाणात नागरिक विविध कामांसाठी शहरात येत असतात. मात्र, सरकारी दवाखाना, पोलिस ठाणे, तहसील कार्यालय, बसस्थानक, पोस्ट ऑफिस, अमरधाम, कब्रस्तान, दशक्रिया विधी घाट तसेच विविध धार्मिक स्थळांकडे जाण्यासाठी योग्य दिशादर्शक फलक नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याचे फुलडाळे यांनी निदर्शनास आणून दिले.

शहरातील अनेक चौक व रस्त्यांवरील नामफलक जीर्ण झाले असून काही ठिकाणी फलकच नसल्याने नवीन नागरिकांना मार्ग शोधताना अडचणींचा सामना करावा लागतो.

## औषध विक्रीवर नियंत्रणासाठी अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांशी चर्चा

**पुणे (दै. संध्या)**



राज्यात वाढत्या ऑनलाइन औषध विक्रीमुळे सार्वजनिक आरोग्य, रुग्ण सुरक्षा तसेच अधिकृत औषध विक्रेत्यांसमोर निर्माण झालेल्या समस्यांच्या पार्श्वभूमीवर आमदार शेखर निकम यांनी राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांची मंत्रालयात भेट घेत संबंधित विषयाकडे गांभीर्याने लक्ष वेधले. यापूर्वी चिपळूण तालुका औषध विक्रेते संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार शेखर निकम यांची भेट घेऊन ऑनलाइन औषध विक्रीमुळे उद्भवत असलेल्या विविध अडचणींबाबत सविस्तर निवेदन दिले होते. या निवेदनाची गंभीर दखल घेत आमदार निकम यांनी हा विषय शासन दरबारी प्रभावीपणे मांडत मंत्री नरहरी झिरवाळ यांच्याशी सविस्तर चर्चा केली. यावेळी ऑनलाइन माध्यमातून वैद्यकीय चिठ्ठीची योग्य पडताळणी न करता होणारे औषध वितरण, काही कंपन्यांकडून दिल्या जाणाऱ्या अवाजवी सवलती तसेच त्यामुळे पारंपरिक आणि अधिकृत औषध विक्रेत्यांवर होत असलेला आर्थिक परिणाम या विषयांकडे आमदार निकम यांनी मंत्र्यांचे लक्ष वेधले.

औषध विक्री हा अत्यंत संवेदनशील विषय असून तो थेट जनतेच्या आरोग्याशी संबंधित असल्याने यासंदर्भात कठोर नियमावली आणि प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच अवैध ऑनलाइन औषध विक्रीवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने तातडीने प्रभावी पावले उचलावीत, रुग्ण सुरक्षा सुनिश्चित करावी तसेच अधिकृत औषध विक्रेत्यांच्या न्याय्य हक्कांचे संरक्षण करावे, अशी मागणीही आमदार शेखर निकम यांनी यावेळी केली. यावर मंत्री नरहरी झिरवाळ यांनी जनतेचे आरोग्य, रुग्णांची सुरक्षितता तसेच अधिकृत औषध विक्रेत्यांचे हित जपण्यासाठी शासन स्तरावर सकारात्मक पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

## 'अपोलो नेस्ट : मातृत्वाच्या प्रवासाची साथ' उपक्रमाचा शुभारंभ

**पुणे (दै. संध्या)**



मातृदिनानिमित्त अपोलो हॉस्पिटल्स पुणे येथे मातृत्वाचा सन्मान, कृतज्ञता आणि प्रेरणेचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. समाजातील मातांच्या अमूल्य योगदानाला सलाम करण्यासाठी आयोजित विशेष कार्यक्रमात पुण्यातील अनेक मातांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. आनंद, उत्साह आणि आरोग्यविषयक जनजागृतीने भरलेला हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

या कार्यक्रमाला विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांची उपस्थिती लाभली. त्यामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ आणि मीरा परिचर्या गृहाच्या संचालिका डॉ. सुनीता पोटे, भारतातील पहिल्या महिला रिक्षाचालक सौ. शीला दावरे तसेच अभिनेते सिद्धार्थ चांदेकर यांच्या आई सौ. सीमा चांदेकर यांचा समावेश होता. मातृत्व, कुटुंब आणि सामाजिक जबाबदाऱ्या यांचा उत्तम समतोल साधत प्रेरणादायी कार्य करणाऱ्या या मान्यवरांचा विशेष सत्कार करण्यात आला. विविध पिढ्यांतील महिलांसाठी त्या प्रेरणास्थान असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मनीषा करमरकर यांनी मातांची जिद्द, ताकद आणि निस्वार्थ प्रेम याविषयी मनोगत व्यक्त केले. मातृत्वाच्या प्रत्येक टप्प्यावर महिलांना योग्य आरोग्यसेवा आणि भावनिक आधार मिळणे किती महत्त्वाचे आहे, यावर त्यांनी विशेष भर दिला. या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले 'अपोलो नेस्ट – मातृत्वाच्या प्रवासाची साथ' या विशेष गर्भारपणपूर्व काळजी उपक्रमाचे उद्घाटन. गर्भवती महिलांना सर्वसमावेशक मार्गदर्शन आणि आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. गर्भधारणेपासून ते बाळाच्या जन्मानंतरच्या सुरुवातीच्या काळापर्यंत महिलांना वैद्यकीय, मानसिक आणि शारीरिक आधार देण्याचे उद्दिष्ट या उपक्रमामागे आहे. या उपक्रमासाठी स्त्रीरोग, बालरोग, नवजात शिशू, आहार, मानसिक आरोग्य, स्तनपान मार्गदर्शन आणि शरीर उपचार क्षेत्रातील तज्ज्ञांची विशेष टीम कार्यरत राहणार आहे. या उपक्रमाअंतर्गत गर्भवती महिलांना वैद्यकीय सेवा, योग्य आहारविषयक मार्गदर्शन, मानसिक आरोग्य सहाय्य, नवजात बाळाची काळजी, स्तनपान सल्ला आणि शरीर उपचार सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कार्यक्रमादरम्यान मातृदिन आणि 'अपोलो नेस्ट' उपक्रमाच्या शुभारंभानिमित्त केक कापण्याचा कार्यक्रमही पार पडला. यावेळी होणाऱ्या मातांसह अपोलो हॉस्पिटल्सच्या चमूने मातृत्वाचा आनंद उत्साहात साजरा केला.

या सोहळ्यात आकर्षक करमणूक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. विविध खेळ, सौंदर्य उपक्रम, नख सजावट, डोळ्यांची सजावट तसेच स्वतः मातृदिन शुभेच्छापत्र तयार करण्यासारख्या उपक्रमांमध्ये महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. 'अपोलो नेस्ट'सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून अपोलो हॉस्पिटल्स महिलांना आणि कुटुंबांना मातृत्वाच्या प्रत्येक टप्प्यावर संवेदनशील, दर्जेदार आणि आधुनिक आरोग्यसेवा देण्याच्या आपल्या बांधिलकीला अधिक बळकट करत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

